## प्रकरण तिसरे

## "स्त्रीचे वैवाहिक जीवन"

"रक्षेत्कन्यां पिता विन्नां पतिः पुत्रास्तु वार्धके ।
अभावे ज्ञातयस्तेषां स्वातन्त्रं न क्वचित्स्त्रियाः ।।"

{या·स्मृ·1·3·85}

"भर्तृभ्रातृपितृज्ञातिश्वश्रुश्वशुरदेवरैः ।
बन्धुभिश्च स्त्रियः पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।।"

{या·स्मृ·1·3·82}

# प्रकरण तिसरे

## स्त्रीचे वैवाहिक जीवन

मानवी जीवनामध्ये विवाह संस्काराला अतिशय महत्त्व आहे. या संस्कारामुळे स्त्री व पुरुष, पत्नी व पती म्हणून एकत्र येतात. मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती म्हणतात की, "मुलींना उपनयनाचा अधिकार नाही.[1] त्यांच्या उपनयनाच्या जागी विवाह संस्कार मानावा."[2] सर्व संस्कारांमध्ये विवाह संस्कार अत्यंत महत्त्वाचा असल्याने आणि स्मृतिकारांनी केलेल्या अशा नियमांमुळे साहजिकच विवाह प्रकरणाविषयी औत्सुक्य निर्माण होते. त्यांनी तत्संबंधी कोणकोणते सामाजिक नियम केले आहेत. ते अभ्यासण्याची गरज भासू लागते.

**विवाहाची आवश्यकता :-**

अपरार्कादि टीकेमध्ये विवाह प्रकरणाच्या प्रारंभी गृहस्थधर्म सांगत असता-

"अपत्नीको नरो भूप कर्मयोग्यो न जायते ।....

पत्नी धर्मार्थकामानां कारणं प्रवरं नृणाम्।।"

या शब्दात विवाहाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. इहलोकामध्ये आणि परलोकामध्ये उत्तम गती प्राप्त करावयाची असेल तर त्यासाठी पुत्रजन्म महत्त्वाचा मानला जात असे आणि ही गोष्ट गृहस्थाश्रमी विवाह संस्कारामुळे साध्य करू शकत असे. एकंदरीत मोक्ष हा पुरुषार्थ सिद्ध होण्याकरिता पर्यायाने विवाह संस्कार महत्त्वाचा मानला जात असे.

**स्त्री-समंत्रक विवाह :-**

"कन्येच्या बाबतीत विवाह संमत्रक करावा परंतु इतर क्रिया मंत्रावाचून कराव्यात" या याज्ञवल्क्याच्या नियमाबाबतची चर्चा यापूर्वीच्या प्रकरणात केली आहे. तथापि -

इतर संस्कार हे स्त्रीबाबत अमंत्रक सांगितले आहेत· परंतु विवाह हाच तेवढा समंत्रक का ? याविषयी विचार करता असे लक्षात येते - विवाहामध्ये एक स्त्री आणि एक पुरुष अशा दोन व्यक्ती एकत्र येतात· दोघांच्यावर या प्रसंगी एकत्रित संस्कार केले जातात· तेव्हा स्त्रीवर संस्कार नाही म्हटले की पुरुषावरही नाही· मग त्याच्यावर अन्याय होईल आणि ही गोष्ट याज्ञवल्क्याने जाणली असावी· त्यामुळेच की काय त्याने स्त्रीच्याबाबतीत विवाह संस्कार संमत्रक करावा असा नियम केला असावा ·

**विवाहाचे वय :-**

याज्ञवल्क्याने स्त्रीबाबत "उपनयनाच्या ऐवजी विवाह संस्कार मानावा" असे म्हटल्याचे यापूर्वी सांगितले आहे· त्याने चतुर्वर्णाचे उपनयनाचे वय सांगितले आहे· त्यावरून मुलीच्या विवाहाचा कालावधी साधारणपणे आठवे वर्ष असा सांगितला असल्याचे लक्षात येते·

दुसरा उल्लेख कन्यादानाच्या अधिकार चर्चेप्रसंगी आढळतो -
"अप्रयच्छन्समाप्नोति भ्रूणहत्यामृतावृतौ···"[3] याप्रमाणे जर एखाद्या अधिका-याने कन्यादान केले नाही व विवाहापूर्वीच कन्या ऋतुमती झाली तर प्रत्येक ऋतुसमयी त्या अधिका-यास भ्रूणहत्येचे पाप लागते·

यावरून असे लक्षात येते की, मुलगी रजस्वला होण्यापूर्वी म्हणजे साधारणपणे चौदा वर्षाच्या आत तिचा विवाह व्हावा अशा प्रकारची अपेक्षा याज्ञवल्क्याने व्यक्त केली आहे·

एकंदरीत याज्ञवल्क्याने 8 ते 14 हे मुलीचे विवाहयोग्य वय मानले आहे· पुरुषाच्या विवाह वयाचा स्पष्ट उल्लेख मात्र येथे आढळत नाही·

**वधू-वर परीक्षा :-**

विवाह प्रकरणाच्या प्रारंभी वधूची निवड कशी करावी हे सांगत असताना, ज्याच्या ब्रह्मचर्याचे स्खलन झाले नसेल त्याने बाह्य व आंतरिक लक्षणांनी युक्त, वाग्दानाने किंवा उपभोगाच्या द्वारा पूर्वी दुस-या कोणाची न झालेली, वराच्या मनास आनंद देणारी, असपिंड आणि वयाने व अंग इ·प्रमाणांनी लहान अशा स्त्रीशी गृह्यसूत्रात सांगितलेल्या

विधीने विवाह करावा"[4] असे म्हटले आहे. बाह्य लक्षणे ही वधूच्या ठिकाणी दिसून येतात. तथापि आंतरिक लक्षणे ओळखणे ही गोष्ट कठीण असल्याने त्यासाठी आश्वलायनाच्या गृह्यसूत्रातील विधी सांगितला आहे. पिंडपरीक्षेच्या द्वारा वधूच्या आंतरिक लक्षणांची परीक्षा कशी करावी यासंबंधी आश्वलायन म्हणतो की, शेतजमीन, गोठा, यज्ञगृह इ. आठ ठिकाणची माती आणून त्यांचे निरनिराळे आठ गोळे करावेत. नंतर "ऋतमग्रे" ते "तद् दृश्यताम्" इ. सूत्रमंत्रांनी त्या गोळ्यांना अभिमंत्रित करावे. नंतर परीक्षार्थी वधूला या गोळ्यांपैकी एक उचलण्यास सांगावा. दुहेरी पिके येणा-या शेतातील गोळा तिने जर उचलला तर तिची मुले धनधान्याने समृद्ध होतील, गोठयातील मातीचा गोळा उचलल्यास तिची प्रजा धनाने युक्त होईल, जुन्या यज्ञवेदीवरील उचलल्यास यज्ञतेजस्विनी प्रजा, न आटणा-या डोहातील उचलल्यास सर्व संपत्तीने प्रजा संपन्न, द्यूतस्थळावरील गोळा उचलल्यास तिची प्रजा फसवी, जुगारी होईल, चौकातील उचलल्यास ती व्यभिचारिणी, नापिक अथवा खडकाळ जमिनीतील उचलल्यास ती दरिद्री किंवा दुःखी होईल, स्मशानातील गोळा उचलल्यास ती मुलगी पतीच्या मृत्यूला कारण होईल."[5] असे समजावे.

अपरार्कादि आणि मिताक्षरेमध्ये आश्वलायनाच्या ह्या आंतरिक परीक्षेचा उल्लेख आढळतो. मात्र बालक्रीडेत या वरील लक्षणांनी युक्त असे म्हणून मनुमत[6] उद्धृत केले आहे. तर दीपकलिकेत शुभलक्षणांनी युक्त असे म्हणून भविष्यपुराणातील लक्षणे[7] दिली आहेत.

आश्वलायनाने सांगितलेल्या वधू निवडीच्या परीक्षेत मातीच्या आठ गोळ्यांपैकी कोणता गोळा ती निवडते त्यावरून ती पुढे कोणत्या भाग्याची इत्यादी होईल याचे अनुमान काढले जाई. वाईट गोळा निवडला तर ती वधू करू नये असा संकेत यामध्ये दिसतो. प्रथम चार प्रकारच्या गोळ्यातून तिने एखादा गोळा उचलल्यास ती मुलगी भाग्याची मानली जाई.

वधू ही "अनन्यपूर्विका" असावी असे म्हटले आहे. या लक्षणाचा अर्थ वाग्दानाने किंवा उपभोगाच्या द्वारा दुस-याची न झालेली[8], पूर्वी दुस-याला न दिलेली[9], दुस-याने उपभोग न घेतलेली[10] असे दिले आहेत. याशिवाय अन्यपूर्वा ही कशी असते. याचे स्पष्टीकरण (या.स्मृ.1.33.67) पुढीलप्रमाणे दिले आहे. अन्यपूर्वा ही दोन प्रकारची असते. एक पुनर्भू व दुसरी स्वैरिणी. पुनर्भू ही क्षता आणि अक्षता अशी दोन प्रकारची असते. संस्कारापूर्वीच पुरुषसंबंधाने जी दूषित झालेली नसते ती

अक्षता होय. जी पहिल्या पतीस सोडून कामवश होऊन आपल्या वर्णाच्याच दुस-या पुरुषाचा कामपूर्तीसाठी आश्रय करते ती स्वैरिणी होय. या दोन्ही प्रकारच्या अन्यपूर्वा विवाहास अयोग्य म्हणून सांगितल्या आहेत. "कांता"म्हणजे वराच्या मनास आनंद देणारी[11] किंवा सुंदर[12], "यवीयसी" म्हणजे वरापेक्षा वधू लहान असावी असे सांगितले असून मिताक्षरेने त्याचा अर्थ वयाने लहान आणि उंचीने ठेंगणी असा सांगितला आहे.

कन्या ही "असपिंड" असावी असे म्हटले आहे. सपिंड म्हणजे "एकशरीरसंबंध" असा अर्थ मिताक्षरेने दिला आहे. वराशी सपिंड असलेल्या मुलीबरोबर विवाह करू नये ह्या निर्बंधाच्या विचाराचे स्पष्टीकरण करताना म.म.काणे म्हणतात,

"सपिंड संबंध ज्या तीन बाबतीत विशेष महत्त्वाचा असतो. त्या म्हणजे वारसा आणि अशौच म्हणजे सुतक. सपिंड संबंधाच्या मुलीबरोबर विवाह न करण्याचा निर्बंध शूद्रासह सर्व वर्णांना लागू पडतो. कोणातरी एका व्यक्तीच्या शरीराचे अंश, दोन व्यक्तींमध्ये असल्या कारणाने त्यांच्यामध्ये सपिंड संबंध उत्पन्न होतो. वडिलांच्या शरीराचे काही अंश मुलाच्या ठिकाणी राहत असल्यामुळे मुलाचा वडिलांबरोबर सपिंडसंबंध असतो. अशाच रीतीने पितामह आणि पितामहासारखे नाते असलेल्या व्यक्तींबरोबर नातू आणि नातवासारखे नाते असणा-या व्यक्तींचा सपिंड संबंध असतो. अशाच रीतीने मुलाचा आपल्या आईबरोबर आणि आजोळच्या आजोबा इ.व्यक्तींबरोबर आईच्याद्वारा सपिंड संबंध असतो. अनादि काळापासून उत्पन्न झालेल्या या जगात अशा प्रकारचे नाते कोणत्या ना कोणत्या प्रकारचे सर्वच व्यक्तींच्या दरम्यान असणे शक्य आहे. ह्यासाठी याज्ञवल्क्याने {1.52-53} सांगितले आहे की, आईच्या बाजूने 5 व्या पिढीनंतर आणि वडिलांच्या बाजूने सातव्या पिढीनंतर सपिंड संबंध राहत नाही. ह्या पिढया कशा मोजाव्यात ह्यासंबंधी बरेच तपशीलाचे नियम मिताक्षरेमध्ये सांगितले आहेत. एखाद्या पूर्वजाने निरनिराळ्या वर्णांच्या स्त्रियांबरोबर विवाह केले असतील त्यांच्या संततीच्या बाबतीत सपिंड संबंध फक्त तीन पिढयापर्यंतच चालतो.

सपिंड संबंधाच्या निर्बंधामुळे आधुनिक काळात अतिशय अडचणी उत्पन्न होतात. मुला-मुलींच्या सहशिक्षणामुळे आणि विवाहाची वयोमर्यादा वाढल्यामुळे प्रीतिविवाह ब-याच वेळा होऊ लागले आहेत आणि असे प्रणयी लोक त्यांच्या दृष्टीने सपिंड संबंधासारख्या क्षुद्र गोष्टींचा विचार करीत नाहीत.

निकटच्या सपिंड संबंधाच्या व्यक्तीमध्ये विवाह कोणत्या कारणास्तव निषिद्ध सांगितला आहे याचे स्पष्टीकरण देत असता डॉ·म·म·काणे यांनी मानवशास्त्रवेत्त्यांच्या वेगवेगळ्या उपपत्ती दिल्या आहेत· निदान भारतामध्ये तरी हा निर्बंध दोन कारणास्तव घातला असावा असे त्यांना वाटते· पहिले कारण असे की, जर अतिनिकटच्या रक्तसंबंधाच्या नातलगात विवाह करण्याची मोकळीक दिली तर, गुप्त प्रेमसंबंध उत्पन्न होतील· जवळच्या अथवा दूरच्या चुलत-चुलत संबंधाच्या मुली एकत्र घरात राहत असतील तर त्यांना बाहेरचे वर मिळविणे कठीण होईल·

## सपिंड विवाहाचे परिणाम :-

सपिंड विवाहाचे परिणाम अधिक तपशीलाने अभ्यासण्यासाठी मी या विषयावर डॉ·अरूण धुमाळे (कोल्हापूर) यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली· त्यांच्याशी केलेल्या चर्चेचा सारांश[13] पुढीलप्रमाणे -

"सपिंड विवाह म्हणजेच वैद्यकिय परिभाषेत "कॉन्सँग्विनिअस मॅरेज" (Consanguineous Marriage) अर्थात रक्तनातेसंबंधातील विवाह म्हणजे आतेभाऊ, मामेभाऊ, मावसभाऊ, मामा इ·शी मुलींचे होणारे विवाह. याप्रकारचे विवाह भारतात जास्तीत जास्त आढळतात आणि तेही शहरांपेक्षा खेडयांमध्ये याचे प्रमाण अधिक आढळते·

या विवाहामंध्ये फायद्यांपेक्षा वैद्यकीयदृष्टया तोटेच अनेक आहेत· कारण यामध्ये ज्या स्त्री व पुरुषाचा विवाह होतो त्यांच्या पुढील पिढीत याचे अनेक दुष्परिणाम दिसून येतात· कारण त्या दोघात पहिल्यापासूनच प्रत्येकी पन्नास टक्के अनुवंशिकता, त्यांच्या आईवडिलांकडून आलेली असते· पुन्हा त्यांच्या मुलांच्यात यातील निम्मी उतरण्याऐवजी रक्तनातेसंबंधामुळे निम्म्यापेक्षा अधिक म्हणजे पंचवीस टक्क्यांहून अधिक उतरते· त्यामुळे अशा विवाहातून जन्माला येणा-या पिढीत अनेक प्रकारच्या शारीरिक वा मानसिक विकृती वा आजार अधिक आढळून येतात· उदाहरणार्थ -

(1) Albinism, (2) Phynylketoneurea, (3) Alkaptoneurea (4) Mongolism, (5) Mucopolysaccharodosis, (6) Turner's Syndrome, (7) Mentally retardation. etc.

स्मृतीकाळामध्ये याज्ञवल्क्याने सपिंड विवाहाचा निषेध केलेला आहे· वैद्यकियदृष्टया देखील अशा प्रकारच्या विवाहामुळे निर्माण होणा-या संततीवर विपरीत परिणाम होत

असल्याचे म्हटले आहे.

आज अशाप्रकारचे नियम डावलून ब-याचवेळा रक्तनाते संबंधातील विवाह घडल्याचे आपण पाहतो.

विवाहासाठी कन्येची निवड करण्यासंबंधी आणखीही दुसरे काही निर्बंध सांगितले आहेत, ते असे की, "कन्या ही अरोगिणी, भावंडे असलेली, ती प्रवर व गोत्र समान नसलेल्या पुरुषापासून उत्पन्न झालेली असावी." "अरोगिणी" याचा अर्थ दीर्घकालीन आजाराने रहित"[14], कुष्ठ इ.रोगांनी रहित[15] असा दिलेला आढळतो. वधू ही भ्रातृमती असणे आवश्यक असे मानले आहे. भावंडे नसलेली मुलगी ही नाकरण्यात येई. याचे कारण वधूच्या पित्याला पुत्र नसल्याने तो पुत्रिका[16] करील असे भय वाटत असे.

ह्या नियमामागे फार मोठी ऐतिहासिक घटना असल्याचे डॉ.काणे यांनी सांगितले आहे. प्राचीन काळी जेव्हा एखाद्या मनुष्याला पुत्र नसे, तेव्हा त्याला आपल्या कन्येची पुत्राच्या जागी योजना करता येई. याचा अर्थ ती कन्या त्याची पुत्रिका होत असे आणि त्या कन्येबरोबर विवाह करणा-या मनुष्याबरोबर तिच्या पित्याला असा करार करता येत असे की, त्या मुलीला होणारा पुत्र हा त्या मुलीच्या पित्याला पुत्र होईल आणि तो आपल्या आईच्या पित्याला त्याच्या सख्या मुलाप्रमाणे पिंड देईल. मध्ययुगीन काळात ह्या निषेधाकडे हळहळू दुर्लक्ष करण्यात येऊ लागले आणि आधुनिक काळात तर भ्रातृविहीन कन्येचा पिता श्रीमंत असेल तर ती कन्या लोभ उत्पन्न करणारी होऊन बसली आहे अशा प्रकारच्या स्थळांवर पटकन उडया पडतात, मग त्या मुलीच्या इतर दोषांकडे देखील दुर्लक्ष केले जाते.

वधू ही सगोत्र किंवा सप्रवर असू नये ही आणखी एक अट याज्ञवल्क्याने दिली आहे. ऋषींच्या नावास प्रवर[17] असे म्हटले जाते आणि रक्तसंबंधाने एकमेकांशी जोडलेल्या मनुष्याच्या समूहास गोत्र"[18] असे संबोधिले जाते. "पिता व माता यांची असपिंड कन्या" असे मनुस्मृतीत म्हटले असल्याचा उल्लेख करून मिताक्षरा म्हणते की, आत्या, मामा, मावशी यांच्या कन्येशी विवाह करता येत नाही. मध्वाचार्यांनी श्रुतिप्रमाण देऊन मातुलकन्येशी विवाह करता येतो, असे म्हटले आहे. तथापि अपरार्क इ.इतर

शास्त्रकारांनी त्याचा निषेध केला आहे.

डॉ.म.म.काणे म्हणतात[19] की, "सगोत्र, सप्रवर आणि सपिंड मुलीबरोबर विवाह करण्याविषयी सांगितलेले हे नियम अतिशय महत्वाचे आहेत. मीमांसाशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणे ज्या नियमांचा हेतू उघड अथवा सहज समजण्यासारखा नसेल त्या नियमांचा भंग झाल्यास ते मूळचे कृत्य अशास्त्रीय आणि निष्फळ ठरते. सगोत्र, सप्रवर आणि सपिंड मुलीसंबंधीच्या निषेधाचे कारण उघड नाही म्हणून ते नियम मूलभूत आणि अवश्य ठरतात." एखाधाने सपिंड, सगोत्र व सप्रवर मुलीशी विवाह केला तरी ती त्याची शास्त्रीय किंवा कायदेशीरदृष्टया पत्नी होत नाही.[20] असे मिताक्षरेमध्ये सांगितले आहे.

सगोत्र इत्यादी बाबतचे नियम सांगून त्यानंतर वधूच्या बाबतीत आश्वलायनाने "कुलमग्रे परीक्षेत मातृतः पितृतःच" सांगितल्याप्रमाणे याज्ञवल्क्याने देखील वधू निवडीबाबत कुलाचाही अवश्य विचार[21] करण्यास सांगितला आहे. मातेकडील पाच आणि पित्याकडील पाच अशा एकूण दहा पुरूषांनी प्रसिद्ध, वेदशास्त्राध्यायनसंपन्न व पुत्र, पौत्र, दास, पशू इ. नी समृद्ध अशा मोठया कुळातील कन्येशीच विवाह करावा. तथापी याला पुढे अपवाद सांगितला आहे की, असे मोठे कुळ जर कुष्ठरोग, अपस्मार इ.शुक्र व शोणित यांच्याद्वारा संतानामध्येही प्रवेश करणा-या रोगांनी युक्त, पौरूषशून्य, आळशी, व्यसनी व अशाच प्रकारच्या दुस-याही दोषांनी युक्त असेल तर त्या कुळातील कन्या टाळावी. मिताक्षरा, अपरार्क व दीपकलिका या तिन्ही टीकांमध्ये हेच सांगितले आहे बालक्रीडेतही "अल्पधनादपि श्रोत्रियकुलात् कन्याम् उद्वहेत्" म्हटले आहे.

एकंदरीत पाहता, वधू निवडीबाबत घालून दिलेल्या नियमांवरून वधू ही सर्व प्रकारे आंतरिक, बाह्य लक्षणांनी युक्त, सुंदर, आकर्षक असपिंड, सगोत्र,सप्रवर नसलेली उत्तम कुलातील इ.असावी. अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त झाल्याचे दिसते.

याज्ञवल्क्याने वधूची आंतरिक लक्षणे ओळखण्यासाठी आश्वलायन सूत्राचा आधार घेतला आहे. तथापि शकुन-अपशकुनावर अवलंबून असलेली ही गोष्ट अन्याय करणारी आणि निश्चितच हास्यास्पद आहे. पिंडपरीक्षेवरून मुलीच्या भविष्याचे अनुमान काढणे हे सर्वथा अन्याय्य वाटते. आजच्या काळात कोणतीही मुलगी अशा वधूपरीक्षेस तयार होणार नाही.

वधू निवडीबाबतचे अनन्यपूर्विकां, अरोगिणी इ. नियम मातीचा कोणता गोळा उचलला यावरुन वधू भाग्याची की दुर्दैवी हे ठरविणे हे अंधश्रद्धेचं लक्षण आहे. वधू निवडीबाबतचे अनन्यपूर्विकां, अरोगिणी इ. नियम पटतात. तथापि सद्यस्थितीत इतर नियमांचा विचार करता आदर्शवादाच्या दृष्टीने हे नियम वाचायला ठीक वाटतात. पण त्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची म्हटल्यास ते शक्य होणार नाही. नियमामध्ये न बसणा-या मुली ह्या लग्नावाचून राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सध्या सौंदर्यादी गुणांकडे दुर्लक्ष करुन शिक्षण, नोकरी इ. गोष्टींना अधिकाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

वधूविषयक नियम सांगितल्यानंतर याज्ञवल्क्याने वराविषयीदेखील नियम सांगितला आहे. वधू ज्याप्रमाणे दहा पुरुषांनी प्रसिद्ध, वेदशास्त्राध्ययनसंपन्न, पुत्र इ. नी समृद्ध अशा कुळातील असावी आणि ते कुल दोषरहित असावे असे सांगितले आहे तद्वत् वराच्या बाबतीतही हाच नियम[22] सांगितला आहे. याशिवाय वर कन्येच्याच समान वर्णाचा किंवा तिच्यापेक्षा उच्च वर्णाचा, स्वतः वेदाध्ययन संपन्न, पुरुषत्वाविषयी मोठया प्रयत्नाने ज्याची परीक्षा करविली आहे असा तरुण, लौकिक व वैदिक व्यवहारामध्ये निपुण, लोकप्रिय असा असावा असे म्हटले आहे.

आश्वलायनाने "बुद्धिमते कन्याम् उपयच्छेत्" म्हटल्याप्रमाणे, "विद्याचरित्रबन्धुशील - संपन्नान् दद्यात्" या गौतमाच्या वचनाप्रमाणेच या ठिकाणी याज्ञवल्क्याचा वराच्याबाबत दृष्टिकोण दिसून येतो. वधू ज्याप्रमाणे गुणसंपन्न असणे आवश्यक त्याप्रमाणे तिला शोभेसाच वर असावा अशी याज्ञवल्क्याची अपेक्षा या ठिकाणी सूचित होते.

धर्माचरण, प्रजा-प्रजेच्या अनुषंगाने नरकापासून संरक्षण, आणि रती अर्थात् संभोगजन्य व इतर सुखे यांची प्राप्ती होणे हे तीन हेतू विवाहाचे सांगितले आहेत. त्यांपैकी पुत्रासाठी समान वर्णाच्या स्त्रीशी विवाह करावा असे म्हटले आहे.

ब्राह्मणाने चार वर्णांच्या, क्षत्रियाने तीन वर्णांच्या व वैश्याने दोन वर्णांच्या भार्या कराव्यात असे विधान आहे. त्यामुळे साहजिकच ब्राह्मणास शूद्र कन्येशी विवाह प्राप्त होतो. तथापि याज्ञवल्क्याला मात्र हे म्हणणे मान्य नाही. याचे कारण त्याने सांगितले आहे की "शूद्र स्त्री च्या ठिकाणी द्विज हा स्वतः पुत्ररुपाने उत्पन्न होत असतो. अर्थात् ब्राह्मणाने ब्राह्मणादी तीन, क्षत्रियांनी क्षत्रियादी दोन व वैश्याने वैश्य जातीच्या एका स्त्रीशीच विवाह करावा असे ठरते. पण या कलियुगात असवर्ण कन्येशी विवाह

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होत नसल्याचे म्हटले आहे.

ज्याची केवळ रतीइच्छा आहे, ज्याला पुत्र झाले असून, भार्या मेली आहे, पण वानप्रस्थादी दुसरा आश्रम घेण्याचा तर अधिकार नाही, त्यामुळे गृहस्थाश्रमात राहण्याचीच मात्र इच्छा आहे, अशा पुरुषाला कोणकोणत्या स्त्रिया होऊ शकतात हे सांगत असता म्हटले आहे, -

वर्णानुक्रमाने ब्राह्मणास तीन वर्णाच्या तीन, क्षत्रियास दोन, वैश्यास आपल्यास वर्णाची एक भार्या सांगितली आहे. शूद्रास एक शूद्र स्त्रीच सांगितली आहे. पण सर्वांना अशा प्रसंगी सवर्ण भार्या मुख्य म्हणून सांगितली आहे. पण ती न मिळाल्यास पुढची करावी असे सांगितले आहे.[23]

## विवाहाचे प्रकार :-

वधू-वरांची लक्षणे सांगितल्यानंतर ते ज्या विवाह संस्काराने बद्ध होतात, त्या विवाहाचे आठ प्रकार[24] याज्ञवल्क्याने सांगितले आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गंधर्व, राक्षस आणि पैशाच हे प्रकार होत. प्रत्येक विवाहाचे लक्षण सांगून त्या विवाह संबंधातून निर्माण झालेल्या संततीचा मागील, पुढील पिढीवर, स्वतःवर होणारा परिणामही सांगितला आहे.

वर सांगितलेल्या लक्षणांनी युक्त असलेल्या वराला यथाशक्ती अलंकारांनी भूषित केलेली कन्या, कन्यादानविधीने दिली जाते तो "ब्राह्म" विवाह होय. अशा मुलीचा पुत्र पितर इ.दहा, पुत्र इ.दहा आणि स्वतःला मिळून एकवीस पुरुषांचा उद्धार करतो.

यज्ञकर्मातील ऋत्विजास दक्षिणा म्हणून यथाशक्ती अलंकृत केलेली कन्या देणे हा "दैव" विवाह होय. या विवाहापासून झालेला पुत्र मागचे सात आणि पुढील सात अशा चौदा पुरुषांचा उद्धार करतो. वरापासून गाय व बैल यांची जोडी घेऊन त्याला यथाशक्ती अलंकृत केलेली कन्या देणे हा "आर्ष" विवाह होय. या विवाहामुळे उत्पन्न झालेला पुत्र मागचे तीन व पुढचे तीन अशा सहा पुरुषांना पवित्र करतो.

"तुम्ही दोघे मिळून धर्माचरण करा" असे म्हणून कन्येची इच्छा करणा-या वराला यथाशक्ती अलंकृत करून कन्या देणे हा "प्राजापत्य" विवाह. या विवाहापासून झालेला पुत्र स्वतःसह मागील पुढील एकूण तेरा पुरुषांना पवित्र करतो.

वरापासून आपल्यासाठी किंवा कन्येकरता धन घेऊन कन्या देणे हा "आसुर"विवाह. वधू व वर यांच्या परस्परांतील तू माझी पत्नी हो, मी तुझा पती होतो" अशा प्रतिज्ञेने दान इ. विधीशिवाय होणारा विवाह म्हणजे "गांधर्व" युद्ध करून कन्येच्या नातेवाईकांस अथवा राजास जिंकून कन्येस नेणे हा "राक्षस" विवाह. तर कन्या झोपलेली असता, अथवा बेसावध असता तिला पळवून नेऊन विवाह करणे हा "पैशाच" प्रकार होय.

वरील आठ प्रकारांमध्ये ब्राह्म विवाह हा उत्कृष्ट प्रकार मानला जातो. तर पैशाच हा विवाह प्रकार निकृष्ट आणि पापयुक्त समजला जातो.

सद्यस्थितीत या विवाह प्रकारांचा विचार केला असता, विशेषतः ब्राह्म विवाह अस्तित्वात असल्याचे दिसते. मुला-मुलीकडील लोक विवाह ठरवितात आणि सालंकृत कन्यादान करतात. काही वेळा या प्रकारातील "सालंकृत कन्यादान" या प्रकाराचा वेगळा अर्थ काढून कायद्याने हुंडाबंदी केली असली तरी आडमार्गाने का होईना, पण हुंडा घेतला जातो. प्रेमविवाहास कन्येकडील लोकांनी संमती दर्शवून सालंकृत कन्यादान केल्यास प्राजापत्य विवाह हा विवाहप्रकार थोडयाफार प्रमाणात का होईना आढळत असल्याचे दिसते. आसुर हा प्रकार काही जातीत अस्तित्वात असल्याचे ऐकावयास मिळते. हल्ली जे प्रेमविवाह होतात ते वधू-वराच्या संमतीने होत असल्याने त्यास गांधर्व हे नांव द्यायला हरकत नाही. एकतर्फी प्रेमातून आसुर हा प्रकार घडत असल्याचे आपण पाहतो. मात्र दैव, आर्ष व राक्षस हे विवाह मात्र बहुधा आढळत नाही.

ज्या प्रकारच्या विधीने एखाद्या दांपत्याचा विवाह झालेला असतो. त्या विधीला अनुरूप त्या दांपत्याची संतती चांगल्या अथवा वाईट प्रकारची निपजते. तसेच अशा संततीमुळे त्याच्या पितृवंशातील आणि मातृवंशातील काही विशिष्ट कमी अथवा अधिक पिढयांपर्यंतचे पुरूष पवित्र होतात असे इतर ग्रंथातही सांगितले आहे. विश्वरूपाने म्हटले आहे की, "ह्या विधानांचा खरा उद्देश विवाहाच्या उदात्त हेतूंचे, नीतिमत्तेचे, शिष्टसंमत आणि शांततेच्या आयुष्यक्रमाचे महत्त्व वंशाच्या आणि समाजाच्या भविष्यकाळाच्या हिताच्या दृष्टीने किती असते ही गोष्ट लोकांच्या मनात बिंबवण्याचा आहे."

विश्वरूपाचे हे म्हणणे अगदी सार्थ वाटते. वधू-वर एकमेकांना अनुरूप, बुद्धिमान, चांगल्या कुळातील समाजमान्य विवाहप्रकाराने एकत्रित आले असतील तर त्याचा

परिणाम मागच्या पिढीपेक्षा पुढच्या पिढीवर अर्थातच संततीवर निश्चितच होत असतो· त्यामुळे त्यांचे आयुष्य हे सौख्यपूर्ण होण्यास मदत होते· अन्यथा जीवन जगत असताना असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागते·

विवाह विधी :-

विवाहाच्या आठ प्रकारांचे वर्णन झाल्यानंतर याज्ञवल्क्याने सवर्ण कन्या आणि असवर्ण कन्या यांचा विवाह-विधीचे वर्णन केले आहे· आपल्या जातीच्या कन्येशी विवाह करीत असता ब्राह्मणाने कन्येचा हात आपल्या हातात धरावा· क्षत्रिय कन्येने ब्राह्मणाशी विवाह करतांना आपल्या हातात बाण धरावा व तो त्या वराने आपल्या हातात धरावा· वैश्य कन्येने क्षत्रिय व ब्राह्मण यांच्याशी विवाह करताना आपल्या हातात चाबूक धरावा· व तो त्या दोन्ही वर्णाच्या वरांनी धरावा· द्विजांनी शूद्र स्त्रीशी विवाह करावा हे म्हणणे मात्र याज्ञवल्क्यास मान्य नसल्यामुळे त्यांनी शूद्र कन्येशी विवाह करताना काय करावे याविषयीचा उल्लेख केलेला नाही· तथापी मनुस्मृतित तिने वस्त्राच्या दशा धराव्यात असा उल्लेख आढळतो·

विवाहातील विधिप्रसंगी याज्ञवल्क्याने सवर्ण कन्येला श्रेष्ठ अधिकार दिल्याचे दिसते· वर्णाचे प्रतिक असलेल्या बाणासारख्या गोष्टींना विधिमध्ये महत्त्व दिले आहे· ब्राह्मण आणि शूद्र स्त्री या दोहोंचा विवाह संबंध मुळातच याज्ञवल्क्याला मान्य नसल्याने त्याने त्यांच्या विधिसंबंधी सांगणे हेतुपुरस्सर टाळले आहे·

आधुनिक काळात उच्चवर्णीय पुरुष कनिष्ठ वर्णीय स्त्रीशी आणि कनिष्ठ वर्णीय पुरुष उच्चवर्णीय स्त्रीशी विवाह करत असल्याचे दिसते· समाजाने अशा विवाहांना पूर्णपणे मान्यता दिली नसली तरी हळूहळू असे विवाह आता रूढ होऊ लागले आहेत· विधींच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास विवाह म्हटल्यानंतर फक्त त्या ठिकाणी वर आणि वधू या दृष्टीने पाहून सर्वांसाठी एकच वा समान विधी असणे आवश्यक आहे· याज्ञवल्क्याने वर्णानुसार जे वेगवेगळे विधी सांगितले आहेत ते अयोग्य वाटतात· कारण अशा भेदामुळे जेष्ठता, कनिष्ठतेचा प्रश्न उपस्थित होऊन भावना दुखावण्याचा संभव आहे·

## कन्यादानाचा अधिकार :-

मुलीचा विवाह कोणाला ठरविता येतो किंवा कन्यादानाचा अधिकार कोणाकोणास प्राप्त होतो त्याबद्दलचे नियम[25] याज्ञवल्क्याने दिले आहेत. कन्यादानाचा सर्वप्रथम अधिकार पित्याला आहे. पिता नसेल, त्याला चित्तभ्रम इ.मुळे कन्यादान करू शकत नसेल तर मुलीचा आजोबा, बंधू (काका किंवा मामा), पित्याच्या कुळातील कोणीही व कन्येची माता यांना क्रमाने एकाच्या अभावी दुसरा असा अधिकार दिला आहे. याप्रमाणे या व्यक्तिपैकी एखाद्या अधिकाऱ्याने कन्यादान केले नाही व विवाहापूर्वी कन्येला रजोदर्शन झाले तर प्रत्येक ऋतुसमयी त्या अधिकाऱ्यास गर्भहत्येचे पातक लागते, असे अपरार्क व मिताक्षरेमध्ये[26] म्हटले आहे. मिताक्षरेमध्ये यापुढे असे म्हटले आहे की, "तथापि योग्य वर न मिळाल्यामुळे कन्या विवाहापूर्वीच ऋतुमती झाल्यास त्याचा दोष दात्याकडे जात नाही. त्याने वरप्राप्तीकरता शक्य तितका प्रयत्न न केल्यास किंवा वेळी गुणवानासही न देता उत्तम गुणवानाच्या अपेक्षेने बसल्यास तो दोषी ठरतो." दीपकलिकेमध्ये[27] "कन्यादानाधिकाराने ऋतुमती कन्येला द्यावी" असे म्हटले आहे. बालक्रीडेत श्लोकात "स्वकुल्य" हा शब्द मातृविशेषण असल्याचे म्हटले आहे.

मिताक्षरा यापुढेच म्हणते की, "कन्यादान करणारा कोणीच नसल्यास वरण्यास योग्य अशा वराशी स्वतः कन्येनेच विवाह करावा." दीपकलिकेत पूर्वी सांगितलेल्या दात्यांच्या अभावी तीन ऋतुकालानंतर स्वतः विवाह करावा.[28] तर बालक्रीडेमध्ये ऋतुमतीने दात्याच्या अभावी तीन वर्षानंतर निवड करावी.[29] असे म्हटले आहे. अपरार्क याबाबतीत म्हणतो [30] की, पिता इ.दात्यांच्या अभावी कन्येने स्वतः समान जातीच्या उत्कृष्ट वर्णाच्या, पाप इ.दोषांनी रहित अर्थात सदाचरणी अशा वराची निवड करावी. अशा प्रसंगी तिने पिता इ.च्या आज्ञेची वाट पाहू नये. रजोदर्शनापूर्वी म्हणजे मुलगी वयात येण्यापूर्वी तिचा विवाह व्हावा असे याज्ञवल्क्याने आपले मत मांडले आहे. अन्यथा ऋतुकाल वाया गेल्याने दात्याला गर्भहत्येचे पातक लागते यावर मिताक्षरेने मांडलेले मत लक्षणीय आहे. त्यांच्या मतावरून तीन गोष्टी लक्षात येतात. एक म्हणजे योग्य वराला कन्या द्यावी. दुसरी म्हणजे वरप्राप्तीकरता दात्याने प्रयत्न करावेत. तिसरी गोष्ट म्हणजे उत्तम गुणवानापेक्षा सामान्य गुणवानाला द्यावी असे केले असता, त्याला गर्भहत्येचे पातक लागत नाही. योगीश्वराला येथे अतिगुणवान वर शोधण्यात कालापव्यय

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

घालविण्यापेक्षा चार-चौघात बुद्धिमान, उठावदार वराला कन्या द्यावी असा अर्थ अभिप्रेत असल्याचे जाणवते.

पिता इ.कोणीच विवाह जुळविणारे नसतील तर कन्येने एका विशिष्ट कालावधीपर्यंत वाट पाहून स्वतः जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य याज्ञवल्क्याने मुलीला दिले आहे, हे त्याचे मत उल्लेखनीय आहे.

मुलीच्या विवाहाबाबत अधिकाराची चर्चा याज्ञवल्क्याने केली आहे. तथापि एखाद्या पुरुषाच्या बाबतीत कोणी विवाह ठरवावा ह्याबद्दल काहीही सांगितलेले नाही.

**कन्यादानाबाबत काही नियम :-**

पिता इ.कन्यादानाचे अधिकारी याज्ञवल्क्याने सांगितले. यांना "कन्या ही एकदाच देता येते" असा शास्त्रनियम आहे. तथापि या नियमाचे उल्लंघन करून जर तिचे पुन्हा हरण केले तर हरण करणारी व्यक्ती ही चोराप्रमाणे दंडास पात्र होते. परंतु या नियमास पुढच्याच ओळीत अपवाद सांगितला आहे तो असा की, "जर पहिला नियोजित वर दुराचरणी, पापी असेल आणि दुसरा वर विद्या, कुल इ.च्या बाबत उत्तम असेल तर दिलेली अर्थात वाग्दानाने युक्त कन्या परत घ्यावी. मात्र सप्तपदी होण्यापूर्वी या नियमाप्रमाणे कन्या परत घेता येते. एकदा विवाह झाल्यानंतर मात्र ती परत घेता येत नाही.[31] अपरार्क म्हणतात की "जिचे वाग्दान झालेले आहे अशी कन्या परत घेता येते. संमंत्रक विवाहानंतर तिला परत घेता येत नाही."

एखाद्या मुलीच्या पित्याने त्या मुलीमध्ये असलेले दोष न सांगता तिचा विवाह केला आणि तिच्याकडील दोष पुढे उघडकीला आले तर तो दाता किंवा पालक उत्तम साहस दंडास पात्र होतो. केव्हा ते सांगत असता म्हटले आहे की दोषरहित कन्येचा स्वीकार करून पुन्हा त्याग केला असता, त्याला उत्तम साहस दंड, खोटया दोषारोपांनी मुलीला दूषित करणा-या वराला शंभर पण दंड सांगितला आहे.[32]

याज्ञवल्क्याने सांगितलेल्या या नियमांवरून असे दिसते की केवळ वाङ्निश्चय झाला असता, नंतर त्या मुलात काही दोष आढळल्यास त्यापेक्षा वरचढ किंवा उत्तम स्थळ मिळाल्यास हा विवाह मोडता येतो. कारण सप्तपदीनंतर विवाह संस्कार पूर्ण होतो. तेव्हा अशाप्रकारची सवलतही याज्ञवल्क्याने दिली आहे.

मुलीमध्ये काही दोष असल्यास त्याची स्पष्ट कल्पना वधूकडील माणसांनी वराला द्यावी· अन्यथा नंतर फसवाफसवीचा प्रकार घडल्याने वधूदाता दोषास पात्र होतो· त्याचप्रमाणे एकदा दोषरहित वधूचा स्वीकार करायचा आणि नंतर तिला सोडून देणे किंवा नसते दोष, तिच्यावर लादणे हे देखील वराच्या दृष्टीने दोषास्पद गोष्ट असल्याचे याज्ञवल्क्याने सांगितले आहे· त्याचे हे मत अगदी योग्य आहे· एकंदरीत संपूर्ण आयुष्य हे एकमेकांच्या सान्निध्यात काढावयाचे असल्याने जीवन सफलतेच्या दृष्टिकोनातून सर्वांनीच विवाहापूर्वी चौफेर विचार करण्याची आवश्यकता आहे·

## अधिवेदन :-

पहिली पत्नी असताना दुसरा विवाह किंवा स्त्री करणे याला याज्ञवल्क्याने "अधिवेदन"[33] असे नांव दिले आहे· हे अधिवेदन कोणत्या कारणास्तव केले जाते हे सांगितले आहे· "सुरापान करणारी, दीर्घ रोगाने ग्रस्त, लबाड, वांझ, द्रव्यादिकांचा नाश करणारी, अप्रिय बोलणारी, कन्याप्रसू, पुरूषाचे अहित करणारी अशा स्त्रीचे अधिवेदन करावे· "मिताक्षरा आणि अपरार्क टीकेत शास्त्रोक्त कारणावाचून कोणी अधिवेदन केल्यास तो "दारव्यतिक्रम"[34] होतो" असे म्हटले आहे· दारव्यतिक्रम याचा अर्थ स्त्रीचा अपमान किंवा अतिक्रम असा सांगितला आहे·

अपरार्काने श्लोकातील "सुरापी" शब्दाचा "मद्यपी" असा अर्थ देऊन "मद्यपान करणे हे महापातक असल्याने स्त्रीत्यागास कारण होते केवळ अधिवेदनास नव्हे" असे म्हटले आहे·

दीपकलिकेत सुरापीबाबत द्विज स्त्री आणि व्याधिता म्हणजे गृहकृत्य करण्यास असमर्थ असा अर्थ घेतला आहे·

बालक्रीडेत[35] स्त्री जर सुरापान करणारी इ·असल्यास अधिवेदन करावे, याचा अर्थ "त्याग करावा असा नाही" असे म्हटले आहे· हाच अर्थ याज्ञवल्क्याला अभिप्रेत असावा कारण या पुढील श्लोकात [26] "अधिवेदन केलेल्या स्त्रीचे पोषण करावे, अन्यथा मोठे पाप लागते· जेथे स्त्री व पुरूष यांचे आनुकूल्य असते त्या घरात धर्म, अर्थ व काम यांची वृद्धी होते" असे सांगितले आहे·

कारणाशिवाय अर्थात निर्दोष स्त्रीचे अधिवेदन करणे हे याज्ञवल्क्याला मान्य नाही· त्यातील स्त्री, दीर्घरोगग्रस्त असल्यास पुरूषाने दुसरी स्त्री करावी हे त्याचे मत योग्य वाटते· पण ती लबाड, वांझ आहे· केवळ कन्याप्रसू आहे म्हणून अधिवेदन करावे हे त्याचे मत योग्य वाटत नाही· कारण आधुनिक काळात मूल न होणे, केवळ

मुली होणे यांचा वैद्यकशास्त्रदृष्टया किंवा वैज्ञानिकदृष्टया विचार केला असता स्त्री इतकाच पुरुषही दोषी असतो, हे सिद्ध झाल्याने स्त्रीचा त्याग करणे हे उचित नाही· स्त्री अप्रिय, लबाड आहे या बारीकसारीक कारणांनी पुरुषांना अधिवेदनाची पर्यायाने दुस-या विवाहाची परवानगी देणे हे स्त्रियांच्या दृष्टीने अन्यायकारक आहे· शिवाय पुढच्याच श्लोकात पती-पत्नींच्या परस्पर आनुकूल्याची प्रेमाची आवश्यकता त्याने प्रतिपादन केली आहे· त्यामुळे होणारा लाभ हा प्रत्येकाने विचारात घेतला पाहिजे· याज्ञवल्क्याने एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे की, अधिवेदन केलेल्या स्त्रीचे अन्न, वस्त्र, दान, मान इ·च्या योगाने पोषण करावे· पुरुषावर टाकलेल्या या जबाबदारीमुळे स्त्रीला काही अंशी का होईना आधार प्राप्त झाला आहे·

"आज्ञेप्रमाणे वागणारी, पुत्रवती व प्रिय बोलणारी अशा स्त्रीचा त्याग केल्यास त्याच्या धनातील तिसरा भाग एवढा दंड पुरुषास सांगितला आहे व अशा स्त्रीचा अधिवेदनादिकाच्या द्वारा त्याग करणारा निर्धन असल्यास त्याला अन्न, वस्त्र, इ·च्या द्वारे तिचे पोषण करण्यास सांगितले आहे·"[37] या ठिकाणी याज्ञवल्क्याने कारणाशिवाय दुसरी स्त्री केल्यास त्याबाबतचा दण्ड सांगितला आहे·

**पातिव्रत्य :-**

पतिव्रता स्त्री कोणती आणि तिला या पातिव्रत्याचा कोणता फायदा होतो त्याविषयी सांगितले आहे की "पती जिवंत असताना किंवा तो मृत झाल्यावर जी स्त्री चंचल होऊन अन्य पुरुषांशी समागम करीत नाही तिची इहलोकी कीर्ती होते व परलोकी पुण्यप्रभावामुळे ती उमेसह क्रीडा करते·"[38] मनुस्मृतीत पुरुषाने व्यभिचार न करता आमरणान्त स्त्रीव्रताने रहावे असे म्हटले आहे·

**स्त्री धर्म :-**

स्त्री कर्तव्याची चर्चा करीत असताना याज्ञवल्क्याने म्हटले आहे की, "स्त्रियांनी नेहमी आपल्या पतीचे वचन मान्य करावे· कारण स्त्रीचा हा परमधर्म आहे· पती जर महापातकांनी दूषित झाला तर तो शुद्ध होईपर्यंत स्त्रीने त्याची वाट पाहावी·"[39] या ठिकाणी पत्नीचे महत्त्वाचे कर्तव्य सांगितल्यावर इतरही काही कर्तव्ये सांगितली आहेत ती अशी - "तिने घरातील भांडी इ·साहित्य जागच्या जागी व व्यवस्थित ठेवावे, गृहकृत्यात दक्ष असावे, संतुष्ट असावे, फार खर्चिक असू नये, सासू-सासरे

इ·वडीलमाणसांचे तिने नेहमी पादवंदन करावे हे सर्व पतीच्या अधीन होऊन करावे·"[40] ती पतीचे प्रिय व हित करण्यात तत्पर व उत्तम आचारसंपन्न असावी, तिने आपल्या सर्व इंद्रियांवर नियंत्रण ठेवावे·"[41]

स्त्री धर्माच्या वर्णनातून याज्ञवल्क्याने स्त्रीच्याकडून काही वास्तव तर काही अवास्तव अपेक्षा बाळगल्याचे दिसून येते· स्त्रियांनी नेहमी पतीवचन मान्य करावे आणि हा स्त्रियांचा धर्म सांगितला आहे· या वाक्यातून पतीचे वचन मग ते पत्नीच्या दृष्टीने अहितकारक असले तरी त्याला मुकाटपणे मान डोलावावी· हा अर्थ निघतो· या ठिकाणी स्त्री स्वातंत्र्यावर बंधन आल्याचे जाणवते· स्त्रीने परमधर्माचे पालन केले तरी तो प्रायश्चित्त इ·द्वारे शुद्ध होईपर्यंतचा काळ तिने एकटीने काढून त्याची प्रतीक्षा करावी· या ठिकाणी "महापातक" असले तरी पत्नीने पतीचे सर्व अपराध पोटात घालावेतच, पण छोटी पापे ही स्त्रीने नगण्य मानावीत असाही सूचितार्थ दिसतो· पतीच्या शुद्ध होईपर्यंतच्या काळामध्ये त्याच्या अधीन होण्याचे म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही याज्ञवल्क्याने दिलेले नाही· याउलट पुरुष शुद्ध झाल्यावर मात्र त्याचा तिने स्वीकार करावा· या पूर्वीच्याच श्लोकामध्ये याज्ञवल्क्याने स्त्री जर लबाड, अप्रिय बोलणारी इ·प्रकारची असेल तर पुरुषाला तिचे अधिवेदन करण्याची अर्थात दुस-या विवाहाची परवानगी पर्यायाने स्वातंत्र्य दिले आहे· परंतु दुस-या बाजूला पुरुषाने महापातके केली तरी देखील परतंत्र राहून त्याच्या शुद्धतेची वाट पाहावी असे याज्ञवल्क्याचे म्हणणे पुरुषांच्या बाजूने झुकते माप देणारे आहे·

एक आदर्श गृहिणी या दृष्टीने याज्ञवल्क्याने स्त्रीकडून केलेली अपेक्षा मात्र योग्य आहे· स्त्रिया ह्या घराच्या उत्कर्षास कारणीभूत असतात· घरातील वडीलमाणसांचा आदर ठेवणे या गोष्टीदेखील मनाला पटणा-या आहेत· चांगल्या संस्कृतीचे द्योतक अशाप्रकारचे हे नियम आहेत·

**स्त्री-रक्षणीय व सेवनीय :-**

याज्ञवल्क्याने स्त्रियांचे रक्षण केले असता होणा-या लाभाचे वर्णन केले आहे·-

"लोकानन्त्यं दिवः प्राप्तिः पुत्रपौत्रकैः।
यस्मात्तस्मात्स्त्रियः सेव्याः कर्तव्याश्च सुरक्षिताः।।"[42]

या श्लोकाचा मिताक्षराकारांनी असा अर्थ घेतला आहे[43] "ज्या अर्थी पुत्र, पौत्र व प्रपौत्र यांच्या योगाने वंशसातत्य राहते व अग्निहोत्राच्या योगाने स्वर्गाची प्राप्ती होते. म्हणजेच स्त्रीच्या योगानेच ही दोन्ही सिद्ध होतात, त्याअर्थी स्त्रीचा प्रजेकरीता उपभोग घ्यावा व धर्माकरीता उत्तम रक्षण करावे" अपरार्क टीकेने म्हटले आहे, "पुत्राच्या योगाने हा लोक पौत्राच्या योगाने आनन्त्य व प्रपौत्राच्या योगाने स्वर्ग मिळतो आणि असे असल्यामुळे पुत्रादिकास कारण होणा-या स्त्रीचे ऋतुकाली सेवन करावे व उत्तम रक्षण करावे. बालक्रीडा आणि दीपकलिका यांनीही अशाच प्रकारचा अर्थ घेतला आहे.

स्त्री ही रक्षणीय व सेवनीय कशासाठी आणि तसे केल्यास होणारे फायदे याज्ञवल्क्याने या श्लोकात सांगितले आहे. या श्लोकाचा विचार केला असता असे आढळते- प्रजोत्पादनाच्या योगाने वंशसातत्य टिकविणे किंवा स्वर्ग इ.लोकांची प्राप्ती करणे यामध्ये जीवनाची इतिकर्तव्यता मानली जायची. म्हणजेच हे उद्दिष्ट किंवा पुरूषार्थ डोळयासमोर असे. अशाप्रसंगी उद्दिष्टपूर्ती होण्याचे साधन या दृष्टीने स्त्रीकडे पाहत असल्याचे जाणवते आणि या स्वार्थी हेतूने याज्ञवल्क्याने स्त्री रक्षणाविषयी तळमळ व्यक्त केलेली दिसते.

**स्त्री सेवन :-**

स्त्री सेवनाविषयी सांगत असताना समरात्रीला समागम करावा, निषिद्ध रात्री टाळाव्यात. इ.पुत्र जन्माला महत्त्व देणा-या मुद्यांची चर्चा यापूर्वीच्या प्रकरणात केली आहे. तथापि प्रस्तुत ठिकाणी केवळ उल्लेख करणे आवश्यक वाटते.

**रजस्वला :-**

जिची मासिक पाळी चालू आहे तिला रजस्वला संबोधिण्यात येते. अशा रजस्वलेने पालन करावयाचे नियम सांगितले आहेत. "रजस्वला स्त्रीने तीन रात्री अपवित्र व मलीन वस्त्रे नेसून राहवे, न्हाऊ नये, स्नान करू नये, डोळयात काजळ घालू नये, भूमीवर निजावे, दिवसा निजू नये, अग्नीस स्पर्श करू नये, दोरी वळू नये, मांस खाऊ नये, शुक्र, गुरु, मंगळ इ.ग्रहास पाहू नये, गळयात किंवा वेणीत फुलांची माळ घालू नये. अत्तरासारख्या सुगंधी पदार्थांचे सेवन करू नये, वीर्य वाढविणारे पदार्थ खाऊ नयेत, मोठमोठयाने हसू नये, डाव्या हाताने पाणी पिऊ नये. ओंजळीने किंवा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

12398

तांब्याच्या पात्राने पाणी प्यावे."[44] अपरार्कादि टीकेमध्ये देखील पैठीनसी, वसिष्ठ इ.नी रजस्वलेविषयी अशाप्रकारचे नियम सांगितले आहेत.

रजस्वला स्त्रीच्या बाबतीत पालन करावयाचे जे नियम सांगितले आहेत, त्यामध्ये स्त्रीला अतिशय अपवित्र मानले आहे. स्वच्छतेच्या दृष्टिकोनातूनही हे नियम अयोग्य वाटतात. स्त्रीचा तो नैसर्गिक धर्म असल्याने बहुधा या कोणत्याच नियमांचे पालन आताची स्त्री करीत नाही. सध्याच्या गतिमान युगात अशा गोष्टींचा विचार करण्यास आज स्त्रीला फुरसत देखील नाही.

**सन्मान :-**

याज्ञवल्क्य म्हणतो,

"भर्तृभ्रातृपितृज्ञातिश्वश्रुश्वशुरदेवरैः।
बन्धुभिश्च स्त्रियः पूज्या भूषणाच्छादनाशनैः।"[45]

पती, माता, पिता, नातेवाईक, सासू, सासरे, दीर व इतर बंधूंनी यथाशक्ती भूषणे, वस्त्रे व अन्न यांच्याजोगे स्त्रियांचा सत्कार करावा. कारण त्या प्रसन्न झाल्या असता धर्म, अर्थ व काम यांची उत्तमप्रकारे वृद्धी करतात. मनूने देखील असे सांगितले आहे की, "ज्या घरातील स्त्रिया प्रसन्न असतात तेथे देवता रममाण होतात व जेथे त्यांचा अपमान होत असतो तेथे सर्व क्रिया निष्फळ होतात. {मनु.स्मृ.3.56}

या श्लोकात याज्ञवल्क्याने स्त्रियांविषयी आदर, सन्मान व्यक्त केला आहे. स्त्री ही कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. ती समाधानी, तृप्त असणे आवश्यक आहे. तिच्यावर सर्व घरादाराची प्रसन्नता अवलंबून आहे. "गृहिणी गृहम् उच्यते" असे म्हटले जाते तेव्हा स्त्रीचा कुटुंबीय इ.नी सत्कार करावा. या याज्ञवल्क्याच्या नियमाने स्त्रीचा दर्जा खचितच उंचावला आहे. त्याचे हे मत स्त्रियांच्या दृष्टीने खचीतच उल्लेखनीय आहे.

**प्रोषितभर्तृका :-**

जिचा पती प्रवासाला म्हणजे बाहेरगावी गेला आहे ती प्रोषितभर्तृका. अशा स्त्रीने पतीच्या परोक्ष कसे राहावे याविषयी म्हटले आहे[46] "प्रोषितभर्तृकेने क्रीडा, शरीरसंस्कार, समाजोत्सवदर्शन, हास्य आणि परगृही गमन यांचा त्याग करावा. मिताक्षरा म्हणते "जिचा पती देशांतरास गेला आहे अशा स्त्रीने चेंडू, सोंगटया इ.नी खेळणे

अंगास उटणे वगैरे लावून नहाणे, जनसमूह व विवाह इ.उत्सव यास पाहणे, थोडेसे निमित्त झाले असता मोठयाने हसणे व दुस-याच्या घरी जाणे ह्या गोष्टी टाळाव्यात. "झोपाळ्यावर बसणे, नृत्य करणे, चित्रे पाहणे, फिरावयास जाणे, वाहनात बसणे, उत्तम भोज्य व पेय पदार्थांचे सेवन करणे. पुष्पांच्या माळा, दागिने वगैरे घालणे, काजळ घालणे, आरशात पाहणे, वेणीफणी करणे इ.करू नये. पती निर्वाहाची व्यवस्था करून गेला असता पत्नीने नियमाने राहावे व त्याने निर्वाहाची सोय केलेली नसल्यास तिने अनिंद्य शिल्पावर आपला निर्वाह करावा" असे शंखस्मृतीत आणखी सांगितले आहे याचा उल्लेख अपरार्कादि टीकेने केला आहे. अर्थात या ठिकाणी पती बाहेरगावी जात असताना उपजीविकेची सोय केली आहे की नाही या बाबीचा विचार करून नियम सांगितला आहे.

प्रोषितभर्तृकेने विशिष्ट नियम पालनांचे बंधन प्रस्तुत ठिकाणी घातलेले दिसते. पती नसताना विरहाच्या बेचैन अवस्थेमध्ये, तिने यदाकदाचित शृंगार केला तर समाजातील काही व्यक्ती गैरफायदा घेण्याचा संभव नाकारता येणार नाही. शिवाय तिने उच्छृङ्खल वर्तन करू नये हा या नियमापाठीमागील उद्देश दिसतो.

शंखस्मृतीत सांगितलेल्या गोष्टीचा उल्लेख अपरार्कादि टीकेने केला आहे. त्यामध्ये प्रोषितभर्तृकेची उपजीविकेची सोय असेल तर तिला नियमाने राहण्यास सांगितले आहे पण तशी सोय नसल्यास तिला उदरनिर्वाहासाठी घराबाहेर पडण्याची सवलत दिली आहे. तथापि अनिंद्य अशा उद्योगाच्या आधारे तो करण्यास सांगितले आहे. हे मतही योग्य वाटते. एकंदरीत अशा स्त्रीने पतीच्या आगमनाची वाट पाहावी असे या नियमांवरून दिसते.

**स्त्री स्वातंत्र्य :-**

स्त्री स्वातंत्र्याबाबत विचार करता स्त्री पूर्ण मुक्त असावी का ? कामे इ. करताना, समाजात वावरताना स्त्रीवर मुळीच बंधने असू नयेत किंवा काय ? या बाबतीत हल्ली बराच उहापोह होतो. धर्मशास्त्रातील वचने उद्धृत करून याविषयी विचारवंतांनी आपली मते मांडलेली आढळतात. स्त्री स्वातंत्र्याविषयी याज्ञवल्क्याचे मत पुढीलप्रमाणे मांडता येईल.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"रक्षोत्कन्यां पिता विन्नां पतिः पुत्रास्तु वार्धके।
अभावे ज्ञातयस्तेषां स्वातन्त्र्यं न क्वचित्स्त्रियाः।।"[47]

या श्लोकाचा अर्थ असा- "कन्येचे रक्षण पित्याने, विवाहानंतर पतीने, वृद्धपणी पुत्राने आणि यांच्या अभावी आप्तांनी तिचे रक्षण करावे. स्त्रियांना केव्हाही स्वातंत्र्य देऊ नये.

दीपकलिकेमध्ये श्लोकातील "क्वचित" या अर्थ "कस्यांचित् अवस्थायाम् अपि, ज्ञात्याभावे राजा" असे म्हटले आहे.

बालक्रीडेमध्ये म्हटले आहे-

"काले कर्मणिवा। तथा च आह मनुः
" नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम्।
पतिं शुश्रुषते येन तेन स्वर्गे महीयते।।"
इति कर्मण्यापि पारतन्त्र्य दर्शयति।

मिताक्षरासारात म्हटले आहे- "कुमारी कन्येचे रक्षण पित्याने करावे, विवाहनंतर तिचे रक्षण पतीने करावे, वृद्धपणी तिचे रक्षण पुत्राने करावे. पण पिता, पती इ.तील कोणीच नसल्यास तिच्या ज्ञातीच्या आप्तांनी तिचे रक्षण करावे आणि आप्तही नसल्यास राजाने तिचे रक्षण करावे. सारांश स्त्री स्वातंत्र्यास मुळीच योग्य नाही. येथे रक्षण म्हणजे दुष्कर्मापासून रक्षण असे समजावे."

याज्ञवल्क्याचा स्त्री रक्षणाचा दृष्टिकोण हा मनुस्मृतीप्रमाणेच दिसतो आहे. मनुस्मृती म्हणते-

"पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति।।"

या श्लोकाचा अर्थ असा- बालपणी स्त्रीचे रक्षण वडील करतात, तारूण्यामध्ये पती रक्षण करतो, वृद्धावस्थेत पुत्र रक्षण करतात, स्त्री स्वातंत्र्यास योग्य नाही.

याज्ञवल्क्याने देखील याच आशयाचा नियम मांडला आहे. स्त्री ही स्वातंत्र्यास केव्हाही योग्य नाही. याज्ञवल्क्याने तर "क्वचित्" हा शब्द वापरला आहे. बालक्रीडेने

"कस्यांचित् अवस्थायाम् अपि" असे या शब्दाचे स्पष्टीकरण दिले आहे·

श्लोकातील "रक्षेत्" या शब्दामध्ये मूळ धातू "रक्ष्" हा आहे· त्याचा अर्थ जपणे, काळजी घेणे, संकटापासून वाचविणे इ·आहेत· काहींच्या दृष्टीने - "स्त्रीच्या विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ती असमर्थ असल्याने, पुरुष हा समर्थ असल्याने तिच्या प्रत्येक वयोवस्थेमध्ये तिची काळजी किंवा रक्षण करण्याची आवश्यकता आहे आणि ही जबाबदारी पुरुषांवर पडली आहे· एकंदरीत येथे मनुस्मृतीने स्त्री रक्षणाची तळमळ व्यक्त केली आहे·

• यालट "स्त्रीच्या स्वातंत्र्यावर बंधने आणून याज्ञवल्क्याने तिच्यावर अन्याय केला आहे", असेही काही विचारवंत मानतात·

"रक्ष्" धातूच्या अर्थातील सत्ता गाजविणे इ·अर्थ उत्तरकाळात प्रभावी ठरले· परिणामस्वरूप मनुस्मृतीतील व याज्ञवल्क्यस्मृतीतील या वचनांचे अर्थ विपरीत होऊ लागले· स्त्रीला स्वातंत्र्य देऊन चालणार नाही· तिला ताब्यातच ठेवली पाहिजे असा विचारप्रवाह सुरु झाला· मूळ स्मृतींना हे कितपत अभिप्रेत होते हे निश्चित सांगता येणार नाही· परंतु पुढे पुढे या स्मृतिवचनांच्या आधारे स्त्री समाजाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याचे चित्र दिसून येते·

## विधवा स्त्री : सती प्रथा :-

पतिरहित अर्थात विधवा स्त्री विषयी सांगत असता याज्ञवल्क्याने म्हटले आहे[48] "पतिरहित स्त्रीने पिता, माता, पुत्र, भ्राता, सासू, श्वशुर व मामा यांच्याशिवाय राहू नये· अन्यथा ती निंदेस पात्र होते·"

पती नसेल तर पिता इ·च्या आश्रयाने स्त्रीने राहावे· अर्थात पिता इ·नी अशा स्त्रीचे रक्षण करावे हे नसतील तर स्वतंत्रपणे तिने राहू नये· अन्यथा अशा स्त्रीची निंदा होते· याज्ञवल्क्याच्या या नियमाविषयी अपरार्क व बालक्रीडेनेही अशाच प्रकारचे मत व्यक्त केले आहे·

विधवेने कोणाच्या तरी आश्रयाने राहावे, किंवा पिता इ·नी अशा स्त्रीचे रक्षण करावे म्हणजे स्त्रीने जीवनभर निर्दोष जीवन कंठावे, तिने व्यभिचारीवृत्तीचा अवलंब करू नये, हे याज्ञवल्क्याचे मत वावगे नाही· समाजाच्या दृष्टीने निंद्य ठरू नये यासाठी तिच्या कुटुंबियांवर व तिच्यावर ही जबाबदारी टाकली असल्याचे दिसते·

तथापि याज्ञवल्क्याच्या या मतावर मिताक्षरेने जे सतीविषयक स्पष्टीकरण दिले आहे, ते निश्चितच धक्कादायक आहे. "स्त्रीने पतीबरोबर सती जावे, आत्मसमर्पण करावे, हे शास्त्रविहितच आहे आणि त्यामुळे स्त्री व पुरुष या दोहांचाही उत्कर्ष होतो. हे अन्वरोहण चांडाल स्त्रीपर्यंत सर्वांनाच सारखे सांगितले आहे. "सती जाणे" ही आत्महत्या नव्हे. कारण क्षत्रियांच्या सन्मुख मरणाप्रमाणेच पत्नीच्या बाबतीत हे काम्यव्रतच आहे. अन्वारोहण करणा-या स्त्रीला पतीसह स्वर्गलोकाची प्राप्ती होते. अर्थात् यापुढे म्हटले आहे, की जिला स्वर्गसुखाची इच्छा नसेल आणि अशी स्त्री केवळ मुक्त होण्याची इच्छा बाळगत असेल तर मात्र तिने सहगमन न करता ब्रह्मचर्यादी साधनांचा अवलंब करून चित्तशुद्धी संपादन करावी. तिने पिता इ.च्या आश्रयाने राहावे. ऐहिक सुखाची इच्छा असणा-या स्त्रीने पुनर्विवाह करावा. हेही मत त्याने व्यक्त केले आहे. सतीप्रथेचे समर्थन करत असताना मिताक्षरेने व्यास, शंख, अंगिरस, हारित इ.स्मृतिकारांची वचने प्रमाण असल्याचे म्हटले आहे. "सती जाणारी स्त्री मातेचे, पित्याचे आणि पतीचे अशी तिन्ही कुळे उद्धरते" असे हारिताने म्हटले आहे. "सती जाणारी स्त्री माणसाच्या अंगावर जितके केस असतात, तितकी म्हणजे साडेतीनकोटी वर्षे स्वर्गात राहते. गारुडी ज्याप्रमाणे सर्पाला जबरदस्तीने बिळातून बाहेर काढतो, त्याप्रमाणे सती जाणारी स्त्री, पतीला नरक वगैरे ठिकाणाहून बाहेर काढून त्याच्याशी रममाण होते. स्वर्गात अप्सरा तिची स्तुती करतात त्याप्रमाणे ती चौदा इंद्राचे राज्य संपेपर्यंत ती पतीशी क्रीडा करते. ब्रह्मचर्यादी पातकांपासून सती जाणारी स्त्री पतीची मुक्तता करते. पती निधनानंतर जी स्त्री सती जाते, तिची अरुंधतीप्रमाणे स्वर्गलोकात पूजा होते. जोपर्यंत सती जात नाही, तोपर्यंत तिची स्त्री शरीरातून केव्हाही सुटका होत नाही. ती पुन्हा स्त्री म्हणूनच जन्मत राहते." याप्रमाणे सतीप्रथेला महत्त्व देणा-या शास्त्रकारांनी सती गेल्याने होणारे फायदे सांगून ती अधिकाधिक प्रवृत्त व्हावी, यासाठी वरीलप्रमाणे वेगवेगळी प्रलोभने तिला दाखविली आहेत.

सतीप्रथेची कारणमीमांसा[49] डॉ.आ.ह.साळुंखे यांनी पुढीलप्रमाणे केली आहे आणि ती यथार्थ वाटते - अभ्यासकांची याबाबतीत वेगवेगळी मते आहेत. पत्नीचे पतीवर उत्कट प्रेम असेल तर त्याच्या मृत्यूनंतर जिवंत राहणे नकोसे वाटत असल्याने ती सती जाते, मृत्यूनंतर परलोकात गेल्यावर देखील पतीचा सहवास लाभेल अशा-

प्रकारची श्रद्धा किंवा पुढे आपले चारित्र्य कलंकित होईल अशी वाटणारी भीती पती मृत्यूनंतर आपल्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागेल, अशा स्थितीत विटंबनेपेक्षा मरण चांगले, आपल्या मृत्यूमुळे जीवनचक्रातून कायमची सुटका होईल, अशी भावना यासारखी कारणे संभवतात. या व्यतिरिक्त ज्याप्रमाणे या लोकी विविध सुखोपभोग आवश्यक असतात, त्याप्रमाणे परलोकी देखील या सर्वांची गरज असते आणि त्यांची प्राप्ती होऊ शकेल अशी तत्कालीन लोकांची श्रद्धा होती. या श्रद्धेच्या भावनेतून सतीप्रथेचा उगम झाला असावा. वारसाहक्कासाठी पतिवध वगैरे घडू नये किंवा आपल्या पश्चात पत्नी कशी वागेल, तिच्याविषयी वाटणारा मत्सर, हेही कारण संभवते. संपत्तिमधील हक्क, कुटुंबाची प्रतिष्ठावृद्धी यासारख्या कारणांमुळे सती प्रथा अस्तित्वात आली असावी."

सतीप्रथेचा धर्मशास्त्रांनी-शास्त्रकारांनी जसा गौरव केला आहे, समर्थन केले आहे तसे या प्रथेला विरोध करणारे देखील आहेत.

योगीश्वर विज्ञानेश्वराने याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरेमध्ये जो सती मताचा आग्रह केला आहे, तो खरोखरच विश्वास बसणारा नाही. स्त्रीने कल्याणार्थ सती जावे, तथापि तिला जायचे नसेल तर ब्रह्मचर्यवृत्तीने राहावे. उच्छृङ्खलवृत्तीच्या स्त्रिया पुनर्विवाह करतात असे त्याने आपले मत मांडले आहे. स्त्रीने पती निधनानंतर व्यभिचारी वृत्तीचा अवलंब करू नये हे अगदी योग्य आहे. तथापि सतीविषयक मांडलेले विचार हे अत्यंत अमानवी आहेत. सद्यस्थितीत या प्रथेचा विचार करता कायद्याने याला बंदी घातली आहे. असे असले तरी रूपकुँवरसारख्या तरुणीने सती गेल्याने इतिहासजमा झालेल्या या प्रथेची पुनरावृत्ती होऊन उजाळा मिळतो आणि मग त्या संबंधी विचार करण्याची वेळ येते.

राजा राम मोहन रॉय यांच्यासारख्या समाजसुधारकांनी "सती जाणे म्हणजे खून आहे" असे म्हटले आहे. विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, "सतीप्रथेचे समर्थन करणारे लोक मानवाचे शत्रू तर आहेतच, पण आपण हिंदू धर्माचे रक्षक व पूजक आहोत असे ते म्हणत असेले तरी, ते हिंदू धर्माचे मारेकरी आहेत, यात मुळीच शंका नाही. मानव्याचा अध:पात दाखविणा-या मूल्यांचे उघड वा छुपेपणाने समर्थन केल्यामुळे हिंदुत्व उजळून निघणार नाही तर उलट ते अधिकाधिक क्षीणसत्त्व होत जाईल, हे आता तरी लोकांनी ओळखले पाहिजे. हिंदुत्वाचा पुरस्कार करण्यासाठी उच्च मूल्ये

निवडण्याची खबरदारी घ्यावी, एवढी जाणीवही ठेवायची नसेल तर त्यामुळे हिंदूत्वाचा गौरव होण्याऐवजी विटंबनाच होईल हे त्यांनी विसरू नये."

काही शास्त्रकारांनी म्हटले आहे की, पतीबरोबर सती जाण्यापेक्षा त्याच्यामागे जिवंत राहून आणि ब्रह्मचर्याचे पालन करून पत्नी त्याचे अधिक हित साधू शकते. सतीची प्रथा अशास्त्रीय असल्याचे मनुस्मृतीवरील मेधातिथीच्या टीकेमध्ये म्हटले आहे. खरोखर स्त्रीने जिवंतपणी स्वतःला अग्निसमर्पण करावे ही गोष्ट मन, बुद्धीला थिजवून टाकणारी आहे. पतीवरील उत्कट प्रेमामुळे त्या विशिष्ट क्षणी पत्नीच्या मनामध्ये असा विचार येणे अगदी साहजिक आहे, तथापि स्वतःचे जीवन अमूल्य आहे हेही तितकेच खरे। पतीच्या पश्चात अशा स्त्रीने आपल्या मुलांची माता व पिता या दोन्ही भूमिका खंबीरपणे निभावून नेल्या पाहिजेत. त्यांना जीवनप्राप्ती करवून देऊन, स्वप्नपूर्ती करणे आवश्यक आहे. निराधार असणा-या किंवा तसे वाटणा-या स्त्रियांना पुनर्विवाह करणे देखील गरजेचे आहे. त्यामुळेच तिचा समाजामध्ये निभाव लागू शकेल. तथापि सती जाणे हे सर्वथैव अयोग्य आहे.

**पुनर्विवाह :-**

पत्नी मृत झाल्यानंतर पतीने काय करावे याविषयी सांगत असता म्हटले आहे-

"दाहयित्वाग्निहोत्रेण स्त्रियं वृत्तवतीं पतिः।
आहरेद्दिधिवद्दारानग्नींश्चैवाविलम्बयन्।।"[50]

आचारसंपन्न विवाहित स्त्री मृत झाली असता पतीने तिला अग्निहोत्राने जाळून विनाविलंब दुसरी स्त्री व अग्नी यांचा यथाशास्त्र स्वीकार करावा.

प्रस्तुत श्लोकामध्ये याज्ञवल्क्य म्हणतो की पत्नीच्या मृत्यूनंतर पतीने "आविलम्बयन्" म्हणजे विनाविलंब विवाह करावा. असा तत्काल विवाह का करावा याची कारणमीमांसा करीत असताना या श्लोकातील मिताक्षरासारात म्हटले आहे की "पती संसाराविषयी पूर्ण विरक्त होतो. त्यास पुत्रोत्पादन व यज्ञयाग करणे आवश्यक आहे आणि स्त्री शिवाय हे दोनही उद्देश पूर्ण होणे शक्य नाही. यास्तव पुत्र नसल्यास व अवश्य असलेले यज्ञादी केलेले नसल्यास पुरुषाने दुसरा विवाह करावा, शिवाय पुरुषाने चार आश्रमातील कोणत्यातरी एका आश्रमात राहिले पाहिजे, त्याने एक क्षणभरही अनाश्रमी राहता काम नये असा

शास्त्रनियम आहे."

पतीपत्नींचे वैवाहिक जीवन निकोप संबंधावर आधारीत आहे. वैवाहिक जीवनात पतीविषयी पत्नीला वाटणारे प्रेम, निष्ठा आणि पत्नीविषयी पतीला वाटणारे प्रेम किंवा निष्ठा या दोन्ही चक्रांच्या आधारे संसाररथ चालतो. पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने कसे वागावे. प्रोषितभर्तृकेने कसे वागावे याविषयीचे याज्ञवल्क्याचे विचार यापूर्वीच आले आहेत. त्यातून पतीच्या अभावी तिने अव्यभिचारी वृत्तीने वागावे, त्याची वाट पाहावी हे सांगितले. त्याच्या लाभा-तोटयाचे विचारही मांडले. यानंतर या श्लोकामध्ये मात्र याज्ञवल्क्याने म्हटले आहे- "पत्नी मृत झाली असता पतीने विलाविलंब विवाह करावा" या ठिकाणी खोलवर दृष्टिक्षेप टाकता मिताक्षरा मतानुसार याज्ञवल्क्याची भूमिका पक्षपातीपणाची वाटते. पुरुषाच्या या विवाहाचे समर्थन करताना मिताक्षरेने पुत्रोत्पादन व यज्ञयागपूर्ती हे कारण सांगितले आहे. म्हणजे केवळ या कारणांसाठी दुस-या स्त्रीची आवश्यकता असावी, हे मत स्त्रीला कमीपणा देणारे आहे. कारण याचा उघड अर्थ असा आहे, की "पत्नीच्या मृत्यूनंतर एक दिवसही नव्हे, क्षणही वाया जाऊ न देता पतीने पुनर्विवाह करावा" शिवाय यापूर्वीच मिताक्षरेने सतीप्रथेचे समर्थन करून पुनर्विवाह करणारी स्त्री ही ऐहिक सुखोपभोगासाठी कामचार, कामभक्ष, आणि कामवादी होत" असे म्हटले आहे.

यापूर्वी याज्ञवल्क्याने "अनन्यूपूर्विकां न उद्वेहेत्" असे वधूनिवडीविषयी सांगत असता "पुनर्भूः"चा उल्लेख आला आहे. त्यामुळे याज्ञवल्क्याच्या या नियमावरून असे दिसते की स्त्रीचा पुनर्विवाह त्याला मान्य नाही. मात्र पुरुषाने विनाविलंब विवाह करावा असे सांगितल्याने त्याची ही भूमिका पुरुषाच्या बाजूने झुकते माप घालणारी आहे. मिताक्षरेने केलेले समर्थन लंगडे वाटते.

<u>नियोग</u> :-

सती, पुनर्विवाहाचा विचार केल्यानंतर नियोगाबाबतही याज्ञवल्क्यस्मृतीतील विचार[51] पाहणे आवश्यक ठरते-

"अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरः पुत्रकाम्यया।
सपिण्डो वा सगोत्रो वा घृताभ्यक्त ऋतावियात्।।
आगर्भसंभवाग्दच्छेत्पतितस्त्वन्यथा भवेत्।
अनेन विधिना जातः क्षेत्रजः स भवेत्सुतः।।"

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पती मृत किंवा जिवंत असताना गर्भाधानक्षम अशा स्त्रीला पुत्र नसेल तर, पुत्रप्राप्तीची इच्छा असलेल्या अशा स्त्रीशी, वडिलमनुष्यांनी पुत्रोत्पादनार्थ आज्ञा केली असता, पतीचा ज्येष्ठ किंवा कनिष्ठ भाऊ किंवा त्यांच्या अभावी सपिण्ड किंवा सगोत्र यातील कोणीतरी एकाने विशिष्ट अटींचे पालन करून फक्त गर्भधारणा होईपर्यंत गमन करावे· वडिलांची आज्ञा, घृत लावणे, ऋतुकाल इ·विशिष्ट घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास तो पुरुष पतित होतो· नियोगविधीने उत्पन्न झालेला पुत्र ज्याची ती विवाहित स्त्री असेल त्याचा क्षेत्रज होतो·"

स्त्री-पुरुष वैवाहिक जीवनाचा विचार करत असताना "नियोग" या गोष्टीचा देखील याज्ञवल्क्याने विचार केला आहे· त्याविषयी प्रथमतः स्वरूप, माहिती इ·लक्षात घेणे आवश्यक ठरते·

नियोग म्हणजे काय या बाबतीत म·म·काणे म्हणतात- "नियोग म्हणजे एखाद्याच्या पत्नीची अथवा विधवा स्त्रीची नियोजित पुरुषाबरोबर त्याने तिच्याशी संभोग करून पुत्राचे उत्पादन करण्याकरता केलेली नियुक्ती अथवा नेमणूक·"[52] मृत्यू, असाध्य रोग, क्लीबत्व निर्बीजत्व इ·कारणांमुळे पतीपासून पुत्र होण्याची शक्यता नसलेल्या निपुत्रिक स्त्रीने पुत्रोत्पत्तीसाठी आपद्धर्म म्हणून अन्य पुरुषाशी विधिपूर्वक समागम करण्याच्या प्राचीन भारतीय प्रथेला नियोग असे म्हणतात· नियोग शब्दाचे आज्ञा, नियुक्ती आणि कर्तव्य हे अर्थ अभिप्रेत आहेत·"[53] नियोगामध्ये निपुत्रिक सधवेला पती आणि विधवेला वडिलधा-या व्यक्ती पुत्रोत्पादनाच्या हेतूने "आज्ञा" देत· यानंतर तिची व योग्य पुरुषाची पुत्रोत्पादनासाठी तत्कालीक "नियुक्ती" करीत· त्यानंतर त्या दोघांनी "कर्तव्य" भावनेने समागम करावा अशी पद्धती अस्तित्वात होती· निपुत्रिक पत्नी ही "क्षेत्र" म्हणजे जमीन, तिचा निपुत्रिक पती हा "क्षेत्री" म्हणजे जमिनीचा मालक आणि नियुक्त पुरुष "बीजी" म्हणजे बीज पेरणारा, असे मानले जात असे· बीजी म्हणून स्त्रीच्या दिराची व तो नसेल, तर पतीचा सपिंड वगैरेंची नियुक्ती केली जात असे·

नियोगामध्ये स्त्री संमती ही महत्त्वाची मानली जात असे· नियोगापूर्वी ती व्रतस्थ असे· नियोगासाठी स्त्री-पुरुषांना काही विशिष्ट अटींचे पालन करावे लागत असे· त्या अटी अशाप्रकारच्या असत·- केवळ कर्तव्यभावनेने समागम करावा· त्यामध्ये वासनेचा भाग असू नये· विलासाची इच्छा होऊ नये यासाठी पुरुषाने अंगाला तूप

चोपडावे· समागम प्रसंगी संभाषण, चुंबन, आलिंगन इ·वासनायुक्त वर्तन टाळावे· प्रत्येकवेळी ऋतुकाळानंतर फक्त एकदाच याप्रमाणे गर्भ राहीपर्यंत समागम करावा इत्यादी·

नियोग म्हणजे पुनर्विवाह किंवा व्यभिचार मानला जात नसे, तर स्त्रीने पुनर्विवाह करून, परक्या कुलामध्ये जाऊ नये, यासाठी तो पर्याय समजला जात असे· त्यामध्ये कामपूर्तीचा भाग नसे· हा नियोग तत्कालीन धर्म, शास्त्रे, नीती, शिष्टाचार इ·ना·मान्य होता·

नियोगापाठीमागचा एकमेव उद्देश म्हणजे पुत्रप्राप्ती हा होता· पुत्रप्राप्तीद्वारा पितृऋण फेडणे हे कर्तव्य आहे· पुत्राच्या अभावी वंशच्छेद होतो, स्वर्गप्राप्तीही होत नाही, त्याच्या अभावी श्राद्ध, तर्पण, पिंडदान न झाल्याने पितरांना मरणोत्तर चांगली गती मिळत नाही· अशाप्रकारच्या कल्पना या नियोगापाठीमागे होत्या· तत्कालीन समाजामध्ये अशाप्रकारच्या कल्पना रूजल्या असल्यामुळे त्यांचाच स्वीकार केला जात असे·

तत्कालीन सामाजिक स्थितीत या नियोगाच्या प्रथेमुळे स्त्रीच्या वाटयाला फायदे आणि तोटे हे दोन्ही येत असत· तथापि फायद्यांच्या मानाने तोटे हे गौण वाटतात·

नियोगाच्या प्रथेमध्ये स्त्रीचे नेमके स्थान कोणते ? या विषयीचे विचार डॉ·आ·ह·साळुंखे यांनी पुढीलप्रमाणे मांडले आहेत· प्रस्तुत ठिकाणी त्यांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते·-

"पुत्र उत्पन्न करून हयात व मृत क्षेत्रीच्या धार्मिक व अन्य गरजा पूर्ण करणे, हा नियोगामागचा प्रमुख किंबहुना एकमेव उद्देश होता· हा उद्देश पूर्ण करण्याचे साधन वा माध्यम या दृष्टीनेच स्त्रीकडे पाहिले जात होते· तिच्या स्वतंत्र उद्देशाचा विचार नियोगामध्ये अभिप्रेत नव्हता· हे सर्व खरे असले तरी, नियोगामुळे स्त्रीला काही लाभ मिळत होते, हे नाकारता येत नाही· पुनर्विवाहामुळे स्त्रीला हक्काचे व स्वाभिमानाचे जीवन मिळू शकते· नियोगाने स्त्रीला मिळणा-या लाभांचे स्वरूप मात्र अर्थातच तसे नाही· एकदा नियोगाचा अंगीकार केला की, तिची पुनर्विवाहाची वाट कायमची बंद हेही स्पष्ट आहे, तरीही तिला होणा-या लाभांची नोंद घेणे आवश्यक आहे·

स्त्रीला नियोगाची संधी मिळत आहे, याचा अर्थ सती जाण्याच्या घोर प्रसंगातून तिची सुटका झाली आहे आणि निदान तिचे प्राण वाचले आहेत, असा होतो. तिने पतीसाठी पुत्र उत्पन्न केली तरी ते तिचे स्वतःचे आहेत. आता ती सुवासिनी नसली तरी पुत्रवती आहे. पती आणि पुत्र नसल्यावर स्त्रीच्या वाटयाला येणारे एकत्रित कुटुंबातील कमालीच्या लाचारीचे व हलाखीचे केविलवाणे जीवन आता जगावे लागणार नाही. त्यामुळे ती अधिक सुरक्षित, अधिक आश्वस्त जीवन जगू शकते. तिच्या जगण्याला काही आधार, अर्थ प्राप्त होतो. प्रारंभी नियोगाने तीन पुत्र निर्माण करता येत होते. अशा वेळी ओळीने तीन पुत्र न होता, काही मुली होता होता तीन संख्या पूर्ण होणे हे नैसर्गिक होते. त्यामुळे स्वतःच्या मुलाबाळांनी भरलेल्या कुटुंबात राहण्याचे सुख तिला मिळू शकत होते. अंशतः का होईना तिला कामपूर्तीची संधीही मिळू शकत होती. तत्वतः तिच्या समागमावर अनेक बंधने असली तरी व्यवहारात ती बंधने शिथिल होऊन तिला अधिक स्वातंत्र्य घेण्याची संधी मिळत असेल, हेही संभवते, पतिनिधनानंतर व्यभिचारिणी न ठरता धर्मशास्त्रांच्या आधाराने तिला इतपत सुख मिळविता येत होते."

नियोगाचा प्रघात कसा उत्पन्न झाला, त्याबद्दल निरनिराळी मते प्रतिपादन करण्यात येतात. मॅक्लेनानसारख्या पाश्चिमात्य विद्वानांनी असा तर्क केला आहे की, बहुपतीत्वाच्या चालीमुळे नियोगाची रुढी अस्तित्वात आली असावी. जॉली यांच्या सारख्यांनी तिच्या मुळाशी आर्थिक कारण असावे असे म्हटले आहे, विंटरनिटझ् सारख्यांनी दारिद्र्य स्त्रियांची कमतरता आणि एकत्र कुटुंबपद्धती ही या रुढीची कारणे असल्याचे प्रतिपादन केले आहे. म.म.काणे म्हणतात की, "यापैकी कोणतेही कारण संयुक्तिक दिसत नाही. एवढेच म्हणता येईल की, नियोगाची रुढी ही प्राचीन काळचा अवशेष होता. ती रुढी दिवसेंदिवस कमी होत गेली आणि इ.स.आरंभीच्या शतकात तिला कलिवर्ज्य मानून पूर्ण प्रतिबंध घालण्यात आला. नियोगाच्या रुढीची कारणे बहुधा अनेक असतील आणि ती आता आपल्यास अज्ञात झाली असतील परंतु त्यापैकी एक कारण पुत्राविषयी उत्कण्ठा हे होते."[54]

मला असे वाटते की, नियोगाच्या प्रथेचा तत्कालीन समाजव्यवस्थेच्या दृष्टिकोणातून विचार केला जावा. तत्कालीन समाज हा संकुचित नव्हता. नियोगाचा अधिकार विशिष्ट परिस्थितीत त्या व्यक्तींना दिला जात असे. पतीसंमतीने हा नियोग होत

असे· त्यासाठी विशिष्ट अटी घातलेल्या होत्या· त्या पाहिल्या असता या प्रथेमागचा उद्देश पूर्णतः शुद्ध केवळ पुत्रप्राप्ती असल्याचे ध्यानात येते· पंचपतिव्रतात समाविष्ट असलेल्या कुंती, इ·नी देखील पतिसंमतीने नियोगाचा अवलंब केला होता· एक तेजस्वी आणि स्वतंत्र व्यक्तिरेखा म्हणून त्या आपल्या मनावर ठसा उमटवितात· समाजामध्ये महत्त्वाचे स्थान या स्त्रियांना होते· तथापि कालांतराने नियोगाचा समावेश कलिवर्ज्य मानला गेला·

एकंदरीत नियोग हा स्त्रीच्या जीवनामध्ये आधार म्हणून स्वीकारायला हरकत नाही· स्त्रीच्या इच्छेला मुरड घालून केवळ पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत भर घालण्यासाठी पुत्र निर्माण केला पाहिजे म्हणून स्त्रीला नियोगाच्या भरीस घालणे योग्य नव्हे· दुसरीही गोष्ट अशी की समाजातून उठण्यापेक्षा पुत्रवती म्हणून जगणे ठीक आहे·

**व्यभिचार :-**

व्यभिचारिणी स्त्रीबाबत चर्चा करीत असता स्त्रीची प्रशंसा करण्याच्या उद्देशाने याज्ञवल्क्यस्मृती म्हणते की[55] "सोमदेवाने स्त्रियांना शौच दिले आहे, गंधर्वाने शुभवाणी दिली आहे, अग्नीने सर्व प्रकारची पवित्रता दिली आहे· यास्तव स्त्रिया ह्या पवित्र होत·"

तथापि एखाद्या स्त्रीने व्यभिचार केला तर तिच्या बाबतीत काय करावे, हे सांगत असता याज्ञवल्क्यस्मृती म्हणते-[56]

"हृताधिकारां मलिनां पिंडमात्रोपजीविनीम्।
परिभूतामधःशय्यां वासयेत् व्यभिचारिणीम्।।"

"व्यभिचारिणी स्त्रीचे दान, धर्म, समागम इ·बाबतीतील अधिकार काढून घ्यावेत· तिला नेसावयास मलिन वस्त्रे द्यावीत· तिचा जीव कसाबसा राहील इतपत अन्न द्यावे, तिचा प्रत्येकाने तिरस्कार करावा· तिला जमिनीवर झोपावयास लावावे, यापुढे म्हटले आहे-

"व्यभिचारादृतो शुद्धिर्गर्भे त्यागो विधीयते
गर्भभर्तृवधादौ च तथा महति पातके।।"[57]

"बाहेर कोणास न समजता मानसिक संकल्पाने स्त्रीने व्यभिचार केल्यास जे पाप उत्पन्न होते, ते रजोदर्शन झाले असता नष्ट होते. शूद्रापासून गर्भ राहिल्यास त्या द्विज स्त्रीचा त्याग करावा, असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे गर्भवध, पतिवध, ब्रह्महत्यादि महापातक केल्यासही तिचा त्याग करावा.

धर्मशास्त्रानुसार "व्यभिचार" हे एक उपपातक मानले आहे. हा व्यभिचार केल्यास अशा स्त्रीला घरातून बाहेर हाकलण्याचा अधिकार याज्ञवल्क्याने तिच्या पतीला दिलेला नाही. व्यभिचारिणीने दान, धार्मिक कार्यातील सहभाग, समागम इ.बाबतचे अधिकार काढून घेतले जातात. जीव कसाबसा टिकेल इतपत अन्न, मलीन किंवा घाणेरडे वस्त्र, जमिनीचा निवाराही तिला देऊ केला आहे. एका अर्थी व्यभिचाराबद्दल तिला हीन जीवन दिले आहे. तिने केलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप वाटावा हा या पाठीमागील उद्देश दिसतो.

याज्ञवल्क्य म्हणतो की, "व्यभिचारिणी स्त्री मासिक पाळीनंतर शुद्ध होते." हा व्यभिचार "मानसिक" होय, असा अर्थ योगीश्वर व अपरार्कांनी घेतलेला आहे. याचाच अर्थ असा की या टीकाकारांना "स्त्रीने मानसिक व्यभिचार केला तर तिची शुद्धी होऊ शकते. परंतु शारीरिक व्यभिचार केल्यास अशी शुद्धी होऊ शकत नाही. हा अर्थ अभिप्रेत असावा आणि तो योग्यही वाटतो. कारण शारीरिक व्यभिचार हे फार मोठे पाप आहे, प्रतारणा आहे, त्यासाठी प्रायश्चित्त करूनही काय उपयोग ? दुरावलेली मने कदाचित एकत्र येऊ शकतील परंतु ही गोष्ट शारीरिक व्यभिचाराबाबत अशक्य वाटते. दीपकलिकेत "गर्भं विना कायिक वाचनिक व्यवहारे प्रायश्चित्तः"[58] असे म्हटले आहे. या नियमामध्ये पश्चात्तापाने वाटणारी शुद्धता ही याज्ञवल्क्याला अभिप्रेत दिसते.

<u>सारांश</u> :-

1. पुरुषाच्या बाबतीत सर्व संस्कार हे समंत्रक करावेत. स्त्रीच्या बाबत केवळ विवाह संस्कार समंत्रक करावा, त्याचप्रमाणे उपनयनाच्या जागी स्त्रीचा विवाह संस्कार मानावा. असे याज्ञवल्क्यस्मृतीने प्रतिपादिले आहे.

2· साधारणपणे मुलीच्या बाबतीत 8 ते 14 वर्षे हे विवाह योग्य वय आहे, असे याज्ञवल्क्याच्या प्रतिपादनावरून वाटते·

3· वधू निवडीसाठी आंतरिक लक्षणे जाणण्याच्या हेतूने आश्वलायन गृह्यसूत्रातील पिंडपरीक्षेचा आधार याज्ञवल्क्यस्मृतीने घेतला आहे· याप्रमाणे एखाद्या मुलीच्या भविष्याचे अनुमान काढणे अन्याय्य आणि अंधश्रद्धा दर्शविणारे वाटते· बाह्य लक्षणे जाणण्यसाठी अनन्यपूर्विकां, भ्रातृमती, अरोगिणीं इ·अटी घातलेल्या आहेत· वधूच्या आई-वडिलांच्या कुळाचा विचार केला जात असे· सपिंड, सगोत्र इ·विवाहाला मान्यता नाही· •काही अटी मान्य करता, आदर्शवादाच्या दृष्टीने योग्य वाटल्या तरी प्रत्यक्षात त्यांचे तंतोतं पालन करून वधूनिवड करणे कठीण आहे·

गुणसंपन्न अशा वधूला शोभेसा वर असावा यासाठी वरालाही वेदाध्यनसंपन्न, सत्कुलातील असावा इ·अटी सांगितल्या आहेत·

4· विवाहाचे ब्राह्म, दैव इ·आठ प्रकार याज्ञवल्क्यस्मृतीने सांगितले आहेत· त्यामध्ये सद्य-स्थितीत ब्राह्म विवाह अस्तित्वात असल्याचे दिसते· प्राजापत्य विवाह थोडयाफार प्रमाणात आणि वधू-वरांच्या परस्पर संमतीने होत असलेला गांधर्व विवाह ज्याला आपण प्रेमविवाह म्हणतो, हा अस्तित्वात असल्याचे आढळते· एकतर्फी प्रेमातून आसूर विवाह घडल्याचे आपण ऐकतो·

विवाहप्रकारातून निर्माण झालेली संतती मागील व पुढील मातृ-पितृ वंशावर परिणाम करणारी ठरते असे याज्ञवल्क्यस्मृतीने प्रतिपादन केले आहे· तथापि ही संतती मागच्या पिढीपेक्षा पुढील पिढीवर परिणाम करणारी ठरते, असे वाटते·

5· विवाह विधी प्रसंगी याज्ञवल्क्याने सवर्ण आणि असवर्ण वधू यांच्यामध्ये भेद केलेला दिसतो· वर्णांचे प्रतिक असलेल्या गोष्टींना या ठिकाणी महत्त्व दिल्याचे दिसते·

6· कन्यादानाचा अधिकार चर्चेप्रसंगी याज्ञवल्क्यस्मृतीने हा अधिकार सर्वप्रथम पित्याला, नंतर आजोबा, बंधू, पितृकुलातील व्यक्ती याप्रमाणे एकाच्या अभावी दुस-याला आणि सरतेशेवटी का होईल मातेला दिला आहे· रजोदर्शनापूर्वी मुलीचा विवाह

व्हावा अन्यथा पित्याला भ्रूणहत्येचे पातक लागते असे., याज्ञवल्क्यस्मृतीने म्हटले आहे. मिताक्षरेने याबाबत व्यक्त केलेले मत लक्षणीय वाटते. कारण विशिष्ट कालावधीनंतर मुलीला वर निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

6. कन्यादानाबाबत सांगत असता याज्ञवल्क्यस्मृतीने महत्त्वपूर्ण सवलत दिली आहे की, सप्तपदीपूर्वी केवळ वाङ्निश्चय झाला असेल तर प्रथम स्थळापेक्षा उत्तम स्थळ मिळाल्यास असा ठरलेला विवाह मोडता येतो.

कन्येच्या ठिकाणी असणा-या दोषांची स्पष्ट कल्पना वरपक्षाला द्यावी अन्यथा फसविल्यास त्यासाठी दंडयोजना सांगितली आहे.

7. निर्दोष स्त्रीचे "अधिवेदन" करणे याज्ञवल्क्यस्मृतीला संमत नाही. अधिवेदन केलेल्या स्त्रीच्या पोषणाची जबाबदारी पतीवर सोपवून तिला आधार प्राप्त करून दिला आहे.

8. स्त्री कर्तव्यासंबंधी सांगत असता याज्ञवल्क्यस्मृतीने तिच्याकडून काही वास्तव तर काही अवास्तव अपेक्षा गृहीत धरल्याचे जाणवते. "स्त्रियांनी पतीवचन मान्य करावे" हा स्त्रीचा "परमधर्म" असल्याचे म्हटले आहे. मात्र आदर्श गृहिणीच्या संबंधात व्यक्त केलेल्या अपेक्षा चांगल्या संस्कृतीचे द्योतक वाटतात.

9. स्त्री ही रक्षणीय व उपभोग्य कशासाठी, तर याचे हेतू सांगत असता याज्ञवल्क्यस्मृतीने प्रजोत्पादन या द्वारे वंशसातत्य, स्वर्गप्राप्ती हे सांगून स्त्रीला आपल्या उद्दिष्टपूर्तीचे साधन किंवा माध्यम बनविले असल्याचे जाणवते.

10. रजस्वलेने पालन करावयाच्या नियमामध्ये तिच्या नैसर्गिक धर्माचा विचार न करता अपवित्र मानल्याचे दिसते.

11. स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ असल्याने तिच्या प्रसन्नतेच्या, अपेक्षापूर्तीच्या दृष्टीने पती, सासू इ. कुटुंबियांनी तिचा सन्मान करावा हे याज्ञवल्क्यस्मृतीचे मत उल्लेखनीय वाटते.

12. प्रोषितभर्तृकेसाठी विशिष्ट नियम सांगितले आहेत. ते जरी सद्यस्थितीत अयुक्त वाटत असले तरी अशा स्त्रीचा समाजातील व्यक्तींनी गैरफायदा घेऊ नये किंवा पतीच्या अभावी तिचा पाय घसरू नये या दृष्टिकोनातून मांडलेले दिसतात.

13· "रक्ष्" धातूच्या अर्थातील सत्ता गाजविणे इ·अर्थ उत्तरकाळात प्रभावी ठरले· परिणामस्वरूप मनुस्मृतीतील व याज्ञवल्क्यस्मृतीतील या वचनांचे अर्थ विपरीत होऊ लागले· स्त्रीला स्वातंत्र्य देऊन चालणार नाही· तिला ताब्यातच ठेवली पाहिजे, असा विचारप्रवाह सुरू झाला· मूळ स्मृतींना हे कितपत अभिप्रेत होते हे सांगता येणार नाही· परंत पुढे पुढे या स्मृतिवचनांच्या आधारे स्त्री-समाजाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याचे चित्र दिसून येते·

14· विधवा स्त्रीने कोणाच्या तरी आश्रयाने किंवा आधाराने राहावे· निर्दोष जीवन कंठावे, हे याज्ञवल्क्यस्मृतीचे मत वावगे वाटत नाही· तथापि मिताक्षरेने सती प्रथेविषयी मांडलेले मत धक्कादायक वाटते·

15· याज्ञवल्क्यस्मृतीला पुनर्विवाह मान्य नसल्याचे दिसते· मात्र पुरुषाने स्त्रीच्या मृत्यूनंतर "विनाविलंब", लंगडया सबबींवरून विवाह करावा, हे मत स्त्रीवर अन्याय करणारे आहे·

16· नियोगाची चर्चा याज्ञवल्क्यस्मृतीने केली आहे· हा कलिवर्ज्य मानला आहे· नियोगामुळे स्त्रीला फायद्यांप्रमाणे तोटेही संभवू शकतात· नियोग हा जीवनामध्ये आधार म्हणून स्वीकारायला हरकत नाही· समाजातून उठण्यापेक्षा पुत्रवती म्हणून जगणे केव्हाही योग्य। तथापि स्त्रीच्या इच्छेविरूद्ध जबरदस्तीने नियोगाच्या भरीस घालणे योग्य नव्हे·

17· व्यभिचारी स्त्रीसाठी तिला केलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप व्हावा, या हेतूने काही निकृष्ट जीवन तिच्यासाठी सांगितले असले तरी तिच्या पोषणाची जबाबदारी मात्र टाळलेली नाही· त्यामुळे अशा स्त्रीबाबत त्याचा सहानुभूतिदायक दृष्टिकोन दिसतो·

संदर्भ :-


1· या·स्मृ·1·13

2· या·स्मृ·मि·सार बापट 1·15

3· या स्मृ·1·64

4· या·स्मृ·1·3·52

5· आश्वलायन गृह्यसूत्र 1·5·5·6

6· मनुस्मृती

7· बालक्रीडा 1·2·52

8· या·स्मृ·मि· 1·3·52

9· अपरार्क टीका 1·3·52

10· बालक्रीडा 1·3·52

11· या·स्मृ· अपरार्क 1·3·52

12· बालक्रीडा 1·3·52

13· अ· Maxcy Rosenay : Public health and preventive medicine.

ब· Nelson's Textbook of Padiatries Thirteenth edition.

14· दीपकलिका / अपरार्क 1·3·53

15· बालक्रीडा - 1·3·53

16· या·स्मृ·मि·1·3·53

17· या·स्मृ·मि·1·3·53

18·

19· धर्मशास्त्राचा इतिहास डॉ·म·म·काणे, सारांशरूप ग्रंथ, (पूर्वार्ध) अनुवादक - यशवंत भट

20· या·स्मृ·मि·1·53

21· या·स्मृ·मि·1·3·54

22· या·स्मृ·1·3·54/55

23· या·स्मृ·1·3·56/57


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

24· या·स्मृ·1·3·58 ते 61

25· या·स्मृ·1·3·63/64

26· अपरार्क व मिताक्षरा 1·3·63/64

27· दीपकलिका 1·3·63/64

28· दीपकलिका 1·3·63/64

29· बालक्रीडा 1·3·64

30· अपरार्क 1·3·64

31· या·स्मृ·1·3·67

32· या·स्मृ·1·3·66

33· या·स्मृ·1·3·73

34· या·स्मृ/अपरार्क 1·73

35· बालक्रीडा 1·73

36· या·स्मृ·1·74

37· या·स्मृ·मि·1·76

38· या·स्मृ·1·75

39· या·स्मृ·1·3·77

40· या·स्मृ·1·83

41· या·स्मृ·मि·1·87

42· या·स्मृ·1·78

43· या·स्मृ·मि·1·78

44· या·स्मृ·बापट 1·80

45· या·स्मृ·1·3·82

46· या·स्मृ·1·3·84

47· या·स्मृ·1·3·85

48· या·स्मृ·1·3·86

49· हिंदू संस्कृती आणि स्त्री, डॉ·आ·ह·साळुंखे, पृ·94

50· या·स्मृ·1·3·89

51· या·स्मृ·1·33·68/69

52· धर्मशास्त्राचा इतिहास सारांशरूप ग्रंथ, म·म·काणे, पुर्वार्ध अनुवादक- यशवंत भट·

53· विश्वकोश- खण्ड 8, पृष्ठ 672

54· डॉ·काणे यांचा वरील ग्रंथ

55· या·स्मृ·1·3·71

56· या·स्मृ·1·3·70

57· या·स्मृ·1·3·72

58· दीपकलिका - 1·72